






# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - २ रे ❑ अंक -२९५ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शनिवार दि. २१ डिसेंबर २०२४ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६


## रशियातील कझान येथे ९/११ सारखा मोठा हल्ला

### किलर ड्रोनने ३ उंच इमारतींना दिली धडक



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१कझान**

अमेरिकेच्या इतिहासातील सर्वात भीषण ९/११ हल्ल्याची आठवण जगाला करून देणारा भीषण हल्ला रशियातील कझान शहरात झाला आहे. रशियातील कझान शहरात सीरियल ड्रोन (यूएव्ही) हल्ले करण्यात आले आहेत. कझान शहरातील तीन उंच इमारतींमध्ये हे हल्ले झाले. या हल्ल्यामुळे मोठे नुकसान झाल्याचे दिसत आहे.

कझानमधील उंच इमारतींवर ण-त हल्ल्याचे फोटो आणि व्हिडिओ सोशल मीडियावर शेअर केले जात आहेत. वेगवेगळ्या दिशांनी येणारे किलर ड्रोन (यूएव्ही) हवेत इमारतींवर आदळत असल्याचे स्पष्टपणे दिसत आहे. ड्रोन इमारतीवर आदळल्यानंतर मोठा स्फोटही होताना दिसत आहे. या हल्ल्याचा थेट आरोप रशियाने युक्रेनवर केला आहे. रशियाच्या संरक्षण मंत्रालयाने ट्विट करून हा ड्रोन हल्ला युक्रेनने केल्याचे म्हटले आहे.

**२०२४ ची ब्रिक्स शिखर परिषद कझानमध्येच झाली...**

कझान शहरावरील या हल्ल्याची जगभरात चर्चा होत आहे. कारण याच रशियन शहरात २०२४ साली ब्रिक्स परिषद झाली होती. या हल्ल्याचे वर्णन अमेरिकेतील ९/११ (वर्ल्ड ट्रेड सेंटर) हल्ल्याप्रमाणेच केले जात आहे.

## नकली औषध, नकली सरकार, बनावट औषधांच्या घोटाळ्यावर विरोधकांचे आंदोलन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१नागपूर**

राज्य विधीमंडळ हिवाळी अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी महाविकास आघाडीच्या आमदारांनी बनावट औषध घोटाळ्याचा मुद्दा उचलत विधानभवनाच्या पायऱ्यांवर आंदोलन केले. यावेळी 'नकली औषध, नकली सरकार', 'बनावट बहुमत, बनावट औषध' अशा घोषणा देण्यात आल्या.




अंबाजोगाईतील शासकीय स्वराती रुग्णालयात बनावट औषधांचा पुरवठा झाल्यानंतर दररोज नवनवीन खुलासे समोर येत आहेत. या प्रकरणी द्विसदस्य चौकशी समिती स्थापना करण्यात आली आहे. यानंतर राज्यात पाच बनावट कंपन्यांच्या नावे अकरा जिल्ह्यांमध्ये बनावट औषधांचा पुरवठा होत असल्याची माहिती समोर आल्याने खळबळ उडाली आहे. सामान्यांच्या आरोग्याशी सुरू असलेल्या हयगयीचा मुद्दा उचलत विरोधकांनी शनिवारी आंदोलन केले.

विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्या नेतृत्वात झालेल्या या आंदोलनात विजय वडेट्टीवार, नाना पटोले, वरुण सरदेसाई, डॉ. नितीन राऊत आदींचा सहभाग होता. 'बोगस औषधांचा सुळसुळाट, जनतेच्या खिशाला खडखडाट' अशा घोषणा लिहीलेले फलक आंदोलनादरम्यान झळकविण्यात आले. अंबादास दानवे म्हणाले,'डॉक्टरांनी बनावट औषधांची ओळख पटवून त्यांचा वापर थांबवला. पण, सरकारने वेळीच कारवाई केली नाही. तक्रारी असुनही दीड वर्षांपासून चौकशी झाली नाही. यावरून राज्याच्या प्रशासनाची अकार्यक्षमता आणि बेफिकिरी दिसून येत आहे. ज्या कंपन्यांनी औषध पुरवठा केला त्यांची कोणतीही नोंद नाही. त्या कंपन्यांची वेबसाईटही अस्तित्वात नाही. तरीही त्यांना कंत्राट कसे देण्यात आले. संबंधित मंत्र्यांनी यावर कोणतीही कारवाई केली नाही. सरकार लोकांच्या जिवाशी खेळत आहे. या प्रकरणाची साठ दिवसात सखोल चौकशी करण्यात यावी. चौकशी झाली नाही तर मोठे आंदोलन उभे करण्यात येईल.'

## महाराष्ट्राची निवडणूक अन् नेपाळच्या काठमांडूत बैठक; समोर आला धक्कादायक खुलासा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१नागपूर**

भारत जोडो यात्रेत शहरी नक्षलवाद्यांचा समावेश होता असा आरोप काही दिवसांपूर्वी देवेंद्र फडणवीस यांनी केला होता. त्यावरून काँग्रेससह विरोधकांनी त्यांच्यावर निशाणा साधला. त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी पुन्हा या आरोपांचा उल्लेख करत थेट विधानसभेत काही कागदपत्रे आणि पुरावे दाखवले. त्यात नेपाळमधील काठमांडू येथे झालेल्या एका बैठकीचाही हवाला देण्यात आला होता. महाराष्ट्रातील निवडणुकीबाबतही या बैठकीत चर्चा झाली. या चळवळीतील राज्यातील काही नेते काठमांडूच्या बैठकीत सहभागी झाले होते. आता याबाबत आणखी धक्कादायक खुलासा समोर आला आहे.




हरियाणा निकालानंतर आणि महाराष्ट्रातील निवडणुकीपूर्वी १२ ते १४ या कालावधी काठमांडूच्या कांतीपूरमध्ये माओवाद्यांची उच्चस्तरीय बैठक झाली. त्यात राज्यात महायुतीचं सरकार आलं तर सरकारविरोधी वातावरण कसं तयार करायचं यावर विचारमंथन केले गेले. या बैठकीतला भारत, बांगलादेश, नेपाळमधील सदस्य हजर होते. त्यात निकालानंतरच्या रणनीतीवर सखोल चर्चा करण्यात आल्याची माहिती मिळत आहे. एबीपी माझा या वृत्तवाहिनीने सूत्रांच्या हवाल्याने ही बातमी प्रसिद्ध केली आहे.

ईव्हीएम आणि शहरी नक्षलवादावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत भाष्य केले. त्यात नेपाळमधील बैठकीचा उल्लेख करण्यात आला. ही बैठक माओवाद्यांची आंतरराष्ट्रीय पातळीवरील होती. त्यात कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया माओवादीचे नेते भारत, नेपाळ, बांगलादेशसह मणिपूरमधील युनिटही सहभागी होता. विशेष म्हणजे या बैठकीला भारत जोडो यात्रेत सहभागी झालेले, महाराष्ट्रात संविधान बचाओ असा नारा देणारे ४ ते ५ जण सहभागी झाले होते. निवडणुकीत भाजपा महायुतीचा पराभव करण्यासाठी प्रचारही केले जात होते. जर महायुती पराभूत झाली नाही तर पुढील नियोजन काय करावे याचेही निर्देश या बैठकीत माओवाद्यांना देण्यात आले.

**काय आहे प्लॅनिंग?**

पहिल्या टप्प्यात प्रसारमाध्यमे आणि सोशल मीडियातून ईव्हीएमविरोधात आरोप करून संशयाचे वातावरण तयार करायचे. दुसऱ्या टप्प्यात एतच् विरोधात महाराष्ट्रातच नाही तर देशातील इतर राज्यातूनही आवाज बुलंद करून निवडणूक बॅलेट पेपरवर घेण्यासाठी आंदोलन उभे करायचे. महाराष्ट्रातील महायुती सरकारवर नाराज विविध समाज घटकांना एकत्रित आणून रस्त्यावर सरकारविरोधी वातावरण निर्माण करायचे. चौथ्या टप्प्यात महाराष्ट्रात अराजकतेची स्थिती निर्माण झाली असं सांगत सरकारविरोधात आरपारची लढाई उभी करायची असं सर्व प्लॅनिंग नेपाळच्या बैठकीत ठरलं आहे.

**देवेंद्र फडणवीस काय म्हणाले होते?**

१५ नोव्हेंबरला नेपाळची राजधानी काठमांडू येथे एका बैठकीचं आयोजन केले होते. त्यात अशा संघटना सहभागी झाल्या होत्या ज्यांनी राहुल गांधींच्या भारत जोडो यात्रेचा भाग राहिल्या होत्या. बैठकीत ईव्हीएम विरोध आणि महाराष्ट्रातील महायुती सरकारविरोधात कट रचला गेला. भारत जोडो यात्रेतील १८० संघटनांपैकी ४० संघटनांना काँग्रेसच्या काळात फ्रंटल संघटन घोषित केले होते. या संघटना महाराष्ट्रात महाविकास आघाडीसाठी प्रचार करत होत्या असा आरोप करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांना आवाहन केले होते. मी तुमच्या देशभक्तीवर प्रश्नचिन्ह उभे करत नाही, परंतु तुमचा खांदा तुम्ही कोणाला देताय याचा विचार करावा. सरकार येईल-जाईल परंतु हा देश राहिला पाहिजे असं फडणवीसांनी म्हटलं.

**संजय राऊतांचा पलटवार**

नेपाळ, काठमांडूचे कौतुक भाजपा आणि आरएसएसला खूप होते. त्यामुळे तुम्ही ते वाचवायला हवं होते. नेपाळसोबत आपले भावनिक आणि धार्मिक संबंध आहेत. त्याठिकाणी चीन किंवा पाकिस्तानचा प्रभाव वाढला असेल त्याला जबाबदार गेल्या १० वर्षातील मोदींची धोरणे आहेत. नेपाळसारखा देश तुम्हाला सांभाळता आला नसेल तर हे तुमचे अपयश आहे. तिथे माओवाद्यांचा प्रभाव वाढला म्हणजे चीनचा प्रभाव वाढला. भारत कमकुवत झाला तिथे विश्वगुरू काय करतायेत? असा सवाल ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी उपस्थित केला.

त्याशिवाय मी स्वत: राहुल गांधींसोबत २८ किमी चाललोय. मी शहरी नक्षलवादी आहे का हे सांगावे. पुण्यातून अमोल पालेकर यात्रेत सहभागी झाले होते मग ते शहरी नक्षलवादी झाले का, हातात सत्ता आहे म्हणून काहीही तोंडाला येते ते बोलता..कुठे आहे शहरी नक्षलवाद? आम्ही नक्षलवाद संपवला असं गृहमंत्री अमित शाह म्हणाले, तुम्ही त्यांनाच आव्हान देताय. आम्ही सगळे भारत जोडो यात्रेत होतो. समाजातील प्रत्येक घटक यात्रेत सहभागी होता. बऱ्याच ठिकाणी शिवसैनिकांनी त्यांचे स्वागत केले ते शहरी नक्षलवादी आहेत का असा सवाल राऊतांनी देवेंद्र फडणवीसांना विचारला.

## फर्लो, पॅरोलवर बाहेर पडलेल्या कैद्यांवर राहणार डिजिटल वॉच, कारागृहे व सुधारसेवा विधेयक मंजूर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१नागपूर २०**

फर्लो व पॅरोलवर बाहेर आल्यानंतर बरेचदा कैदी फरार होता व त्यांच्या शोधासाठी शासकीय यंत्रणेची धावपळ होते. असे प्रकार टाळण्यासाठी आता अशा कैद्यांवर डिजिटल वॉच ठेवण्यात येणार आहे. आरएफआयडीसारख्या तंत्रज्ञानाचा वापर करून कैद्यांचे ट्रॅकिंग करणारी यंत्रणा उभारण्यात येईल, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. विधानपरिषदेत अधिवेशनाच्या अखेरच्या दिवशी कारागृहे व सुधारसेवा विधेयक मंजूर करण्यात आले. त्याच्या चर्चेदरम्यान मुख्यमंत्र्यांनी ही माहिती दिली.



कारागृहांच्या आत संदेशांची देवाणघेवाण सुरू असते व अनेकदा कैद्यांना भेटायला येणारे लोकदेखील यात सहभागी असतात. त्यामुळे अशा अभ्यागतांचे ट्रॅकिंग करण्याची तरतू या विधेयकामध्ये आहे. कारागृहात वेगळे अर्थकारण चालते व त्या माध्यमातून विविध गैरप्रकार चालतात. त्यांच्यावरदेखील तंत्रज्ञानाच्या माध्यमातून नियंत्रण आणण्यावर भर असेल. कारागृह हे खऱ्या अर्थाने करेक्शनल होम व्हावी यासाठीच सरकारकडून प्रयत्न करण्यात येतील, असे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.

**मुंबईत आदर्श बालसुधारगृह तयार करणार**

राज्यातील बालसुधारगृहाचा मुद्दा चिंताजनक आहे. २०१८ साली कैलास सत्यार्थी यांच्या सहकार्याने मुंबईत देशातील आदर्श बालसुधारगृह तयार करण्याचा आराखडा तयार करण्यात आला होता. एमएमआरडीएला त्याची जबाबदारी दिली होती. मात्र पाच वर्षांत तो विषय मागे पडला. सत्यार्थी यांनी बालसुधारगृहासाठी करेक्शनल होम कसे असायला हवा तसा आराखडा तयार केला होता. त्याचा पाठपुरावा करून आदर्श बालसुधारगृह तयार करणार, असल्याची माहिती फडणवीस यांनी दिली.

**सॅन फ्रॅन्सिस्कोमध्ये नार्वेकरांना जलवा**

या चर्चेदरम्यान फडणवीस यांनी विरोधकांना चिमटेदेखील काढले. कुणाला तुरुंगात जायचे असेल तर सांगावे असे म्हणत त्यांनी मिलींद नार्वेकर यांच्यावर भाष्य केले. नार्वेकर तुम्हाला कुठल्या तुरुंगात जायचे आहे असे विचारणा केल्यावर तुम्ही सांगाल ते कारागृह दाखवायला नेऊ असे मुख्यमंत्री म्हणाले. तिहार जेल पहायला न्या असे म्हटल्यावर तेथे जाण्यासाठी वेगळा मार्ग शोधावा लागेल असा टोला फडणवीस यांनी लगावला. विरोधकांकडून कुणीतरी नार्वेकर यांना सॅन फ्रॅन्सिस्को येथील अक्लाट्राज तुरुंग पहायला नेण्याची व्यवस्था करावी असे म्हटले. यावर नार्वेकर हेच ते तुरुंग पहायला नेऊ शकतात. नार्वेकरांचा सॅन फ्रॅन्सिस्कोमधील जलवा तुम्हाला माहिती नाही, असे फडणवीस म्हणाले.

**विधेयकातील प्रमुख तरतूदी**

कारागृहांचे संगणकीकरणासह आधुनिकीकरण केले जाईल.

राज्यात बहुमजली कारागृहे बांधण्यात येतील.

मानवाधिकार कायद्यानुसार कारागृह कायद्यात बदल

कारागृह प्रशासनासाठी वेलफेअर फंड स्थापन करणार

कैद्यांचे न्यायालयीन, दिवाणी, शिक्षाबंदी वर्गीकरण केल जाईल.

## मोदींच्या प्रभावामुळे महाराष्ट्र, हरियाणात भाजपचा विजय; 'दी मॅट्रीझ' संस्थेच्या सर्वेक्षणात माहिती

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१ नवी दिल्ली**

लोकसभा निवडणुकीत कमी जागा मिळूनही महाराष्ट्र आणि हरियाणा विधानसभा निवडणुकीत भाजपला घवघवीत यश मिळाले. या यशामागे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची लोकप्रियता आणि भाजपविरोधात प्रभावी प्रचार करण्यात विरोधकांना आलेले अपयश हे महत्त्वाचे मुद्दे असल्याचे 'दी मॅट्रीझ' या संस्थेने केलेल्या सर्वेक्षणात म्हटले आहे. पंतप्रधान मोदी यांचा प्रभाव अजूनही नागरिकांमध्ये कायम असल्याचे हे सर्वेक्षण सांगते.

लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्र आणि हरियाणा या राज्यांत अधिक जागा मिळविण्यात भाजपला अपयश आले. महाराष्ट्रात ४८ पैकी महायुतीला १७ व भाजपला ९ जागा जिंकता आल्या, तर हरियाणात १० पैकी पाच जागांवर भाजपला यश मिळाले. मात्र सहाच महिन्यांमध्ये या




दोनही राज्यांमध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत भाजपने मोठे यश संपादन करून या राज्यांत सरकारेही स्थापन केली.'दी मॅट्रीझ' या संस्थेने केलेल्या सर्वेक्षणात पंतप्रधान मोदींची लोकप्रियता आणि विरोधकांचा अपप्रचार रोखण्यात आलेले यश यांमुळे भाजपला सत्ता मिळाल्याचे दिसून आले. हे सर्वेक्षण २५ नोव्हेंबर २०२४ ते १४ डिसेंबर २०२४ दरम्यान महाराष्ट्रात ७६,८३० आणि हरियाणामध्ये ५३,६४७ नागरिकांशी चर्चा करून करण्यात आले आहे. या संस्थेने दोन निवडणुकांदरम्यान मतदारांच्या भावनेतील बदलांवरही प्रकाश टाकला आहे.

## या प्रकरणाचा सूत्रधार, मस्साजोगच्या ग्रामस्थांसमोर शरद पवार गरजले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१बीड**

बीडच्या मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्याप्रकरणाने संपूर्ण राज्य हादरलं आहे. या घटनेचे विधानसभा व लोकसभेतही पडसाद उमटले आहे. शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील आमदारांनी विधानसभेत तर, खासदारांनी लोकसभेत हा विषय मांडून न्यायाची मागणी केली. दरम्यान, आता राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार हे बीडचे खासदार बजरंग सोनावणे, खासदार नीलेश लंके, आमदार संदीप क्षीरसागर यांना घेऊन मस्साजोग गावात दाखल झाले. पवारांनी येथील ग्रामस्थांशी संवाद साधला व संतोष देशमुख यांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचं सांगितलं. तसेच या प्रकरणातील मुख्य सूत्रधाराला शिक्षा होईपर्यंत आमचे शिलेदार स्वस्थ बसणार नाहीत असंही सांगितलं.



शरद पवार म्हणाले, बीड जिल्ह्यात जे काही घडलं ते कोणालाही न पटणारं आणि सहन न होणारं आहे. ज्या तरुण सरपंचाची हत्या झाली आहे त्यांनी गेली १५ वर्षे इथल्या लोकांसाठी भरपूर काम केलं आहे. त्यांनी लोकसेवेचे काम केल्यामुळेच लोकांनी १५ वर्षे त्यांची निवड केली. तो तरुण सरपंच येथील लोकांच्या दैनंदिन सुखदुःखाशी समरूप होणारा होता. वादविवादापासून दूर राहणारा होता. असा हा तरुण कर्तबगार लोकप्रतिनिधी तुमच्या गावात काम करत होता. परंतु, येथील कोणाला तरी दमदाटी झाली आणि त्या प्रकरणी चौकशी करत असताना चौकशी करण्याची भूमिका का घेतली म्हणून बाहेरून कोणीतरी येतो आणि त्यांच्यावर हल्ला करतो. हा हल्ला शेवटी त्यांच्या हत्येपर्यंत जातो हे अतिशय गंभीर प्रकरण आहे. राज्य सरकारला व केंद्र सरकारला याची नोंद घ्यावीच लागेलअसे ही पवार म्हणालेत.

## संपादकीय ......

# थंडीची नव्हे... नाराजीची लाट!

*संपूर्ण राज्य सध्या थंडीच्या लाटेने काकडून गेले आहे. थंड हवेचे ठिकाण असलेल्या महाबळेश्वरपेक्षाही अनेक गावांमध्ये आणि शहरांमध्ये जास्त थंडी पडलेली आहे. राजकीय वातावरण गरम असताना ही थंडीची लाट आपल्या राज्यातील नागरिकांना संभ्रमात टाकत आहे. होणार होणार म्हणून गाजत असलेला मंत्रिमंडळ विस्तार एकदाचा झाला. ज्यांना पाहिजे त्यांना मंत्रिपद मिळाल्यानंतर सर्व काही शांत होईल, असे वाटले होते; परंतु तसे झाले नाही. आपल्या नेत्याला मंत्रिपद मिळाले नाही म्हणून नाराज झालेले कार्यकर्ते गावोगावी निदर्शने करत आहेत.*

*कट्टर अशा पक्ष आमदारांनी पण काही प्रमाणात बंडाचा झेंडा उभारला आहे, असे दिसून येते. आयुष्यभर मंत्रिपदे उपभोगणारे आमदारसुद्धा उतारवयात पुन्हा मंत्रिपद पाहिजे हा हट्ट धरून बसलेले आहेत. एक दोन नेत्यांनी तर चक्क वेगळा रस्ता धरण्याचा इशारा पण दिला आहे. ज्यांना मंत्रिपद अपेक्षित होते; पण ते मिळालेले नाही त्यांनी आपल्यावर अन्याय झाल्याची भावना बोलावून दाखवली आहे. मंत्रिपदे मर्यादित संख्येत उपलब्ध असताना सगळ्यांचे समाधान कसे करायचे, ही पक्षश्रेष्ठींपुढे मोठीच समस्या होती. यापूर्वीच्या मंत्रिमंडळामध्ये मंत्री असणार्या प्रत्येकाला आपल्याला निश्चित मंत्रिपद मिळणार, अशी खात्री होती. या नेत्यांचे कार्यकर्ते आपापल्या गावी साहेबांचे मंत्रिपद कसे साजरे करायचे, याची तयारी करून बसलेले होते. तशा पद्धतीचे बॅनरही लागले होते; पण हाय रे दुर्दैवा! साहेबांचा काही मंत्रिमंडळात समावेश झाला नाही आणि मग हे कार्यकर्ते आपल्याच पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांच्या फोटोला चपलांचे हार घालण्यास सज्ज झाले. गावोगावी निदर्शने करणार्या कार्यकर्त्यांना ज्यांना मंत्रिपद मिळाले नाही त्या आमदारांनीच काही सूचना केलेल्या आहेत की काय, असे वाटते. अर्थात, काही कट्टर कार्यकर्ते स्वतःहूनही निदर्शने करत असतील. कारण, साहेबांना मंत्रिपद नाही म्हणजे आपल्याला कामे, कंत्राटे मिळणार नाहीत असे काहीसे सर्वसामान्य कार्यकर्त्यांचे मत असते.*

*असे सांगण्यात आले आहे की, ही मंत्रिपदे केवळ अडीच वर्षांसाठी आहेत. अडीच वर्षांनंतर यातील बर्याच लोकांना मंत्रिमंडळाबाहेर बसावे लागेल आणि सध्या नाराज असलेल्या लोकांची त्यांच्या जागेवर वर्णी लागेल. आजच्या धावपळीच्या जगात कोणीही अडीच वर्षे थांबायला तयार नाही. प्रत्येकाला मंत्रिपद आजच हवे आहे आणि आताच हवे आहे. ही समस्या कशी सोडवायची, हा ज्या त्या पक्षाचा प्रश्न आहे. सत्ताधारी युतीमधील प्रत्येक पक्षामध्ये नाराजी दिसून आल्यामुळे राज्यामध्ये थंडीच्या लाटेबरोबरच नाराजीचीही लाट सर्वत्र पसरलेली दिसून येते. जशी थंडीची लाट ओसरत जाईल तशीच ही नाराजीची लाटपण ओसरत जाईल. मंत्री पदाऐवजी एखाद्या महामंडळाचे अध्यक्षपद किंवा कुठले तरी राज्यमंत्रिपदाचा दर्जा असलेले पद देऊन सर्वांना शांत करण्यात येईल असे दिसते. संयम आणि धीर राजकारणातून बाद होत चालला आहे, ही काळजी करण्यासारखीच बाब आहे. आता नेते मंडळी आपल्या नाराजांना कसे काय समजावून सांगतील, हे बघायलाच मिळेल. काही जण इतकी वर्षे मंत्रिपद भूषवूणही पद न मिळाल्याने नाराज आहेत. खरे तर, खुर्चीचा मोह सर्वांनाच असतो. सत्येशिवाय शहाणपण नसते, हेच दिसते.*

# शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या हिरक महोत्सवी आयोजित आंतरराष्ट्रीय परिषदेचे थाटात उद्घाटन



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२१अमरावती–** विदर्भातील नामांकित, महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या हिरक महोत्सवाचे औचित्य साधून खपींशीपरींळेपरश्र उेप–षशीशपलश्‌ुप –ििश्रिळलरींळेपी ष एप–सळपशशीळपस षी डींीिंरळपरलश्रश ऊशींशिश्रेशिपीं (खउ–एडऊ २०२४) चे उद्घाटन उत्साहात पार पडले. कार्यक्रमाचे अध्यक्ष पद डॉ. सचिन मांडवगणे (चेअरमन. बोर्ड ऑफ गवरनंस, ऋउजए–), कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून, डॉ. चंद्रशेखर येरामल्ली (प्राध्यापक एरोस्पेस इंजीनीरिंग विभाग, आयआयटी बॉम्बे) डॉ. अरविंद कुमार (सेंटर हेड, ढउड नागपूर) यांची उपस्थिती होती.

उद्घाटन प्रसंगी, डॉ. चंद्रशेखर येरामल्ली यांनी मानवाला जर पृथ्वी वर दीर्घ काळ टिकायच असेल तर अभियांत्रिकी मध्ये डींीिंरळपरलश्रश ऊश–ींशिश्रेशिपीं करणे खूप गरजेचे आहे असे प्रतिपादन केले.

डॉ. अरविंद कुमार यांनी सर्व सहभागी पेपर ििशीशपींशीी ला शुभेच्छा दिल्या. डॉ. सचिन मांडवगाने (चेअरमन बोर्ड ऑफ गवरनंस, ऋउजए–) यांनी सर्व आयोजक प्राध्यापक, सहभागी विद्यार्थी यांचे सुसज्ज आयोजनाबद्दल अभिनंदन केले व सस्टेनेबल डेवलपमेंट हि काळाची गरज आहे असे प्रतीपादन केले. या परिषदेच्या आयोजनाने विद्यार्थ्यांमध्ये अधिक उत्साह दिसून आला.प्रस्तुत कार्यक्रमाचे आयोजन शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आशिष महल्ले यांच्या मार्गदर्शना खाली मुख्य समन्वयक डॉ. राजेश मेटकर सह–समन्वयक डॉ. शांतनू लोही, डॉ. शुभदा ठाकरे, मुख्य विद्यार्थी समन्वयक, वर्णीत उबरहंडे, मुख्य विद्यार्थी सह–समन्वयक पियुष सचवानी व महाविद्यालयाचे विद्यार्थी पार पाडत आहेत.

आंतरराष्ट्रीय परिषद ही दोन दिवसाची असून अमरावती विभागातील अभियांत्रिकी व तांत्रिकी क्षेत्रातील विद्यार्थी, प्राध्यापक,अभियंता, तंत्रज्ञ आदींनी संधीचा भरपूर लाभ घ्यावा असे आवाहन आयोजकांनी यावेळी केले.–

# रोजगार हमी योजनेतील मजुरांच्या खात्यात

## २ हजार ८५६ कोटी रुपये जमा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२१अमरावती** – राज्यातील रोजगार हमी योजनेतील मजुरांच्या बँक खात्यामध्ये सन २०२४– २५ मध्ये २ हजार ८५६.३० कोटी रुपयांचा निधी जमा करण्यात आल्याची माहिती रोजगार हमी योजना विभागाकडून देण्यात आली आहे.

या योजनेंतर्गत १०० दिवसांपर्यंतची मजुरी केंद्र शासनाकडून प्राप्त होणाऱ्या निधीमधून दिली जाते. तर १०० दिवसांच्या वरील मजुरी राज्या शासनाच्या निधीतून दिली जाते. त्यानुसार सन २०२४–२५ मध्ये १०० दिवसांपर्यंत मजुरीचे २ हजार ६१६.३० कोटी निधी आणि १०० दिवसांवरील मजुरीचे २४० कोटी रुपये असा एकूण २ हजार ८५६.३० कोटी निधी मजुरांच्या बँक खात्यात थेट जमा करण्यात आला आहे.केंद्र व राज्य शासनाकडून सन २०२४–२५ मध्ये अनुक्रमे ६६.२१ कोटी व ५.८८ कोटी रुपये असा एकूण ७२.०९ कोटी इतका निधी मजुरीपोटी पालघर जिल्ह्यातील मजुरांच्या खात्यात जमा करण्यात आला असल्याची महितीही 'रोहयो' विभागाने दिली आहे.



# कमी कालावधीतील जास्त नफा मिळवून देणाऱ्या पालेभाज्यांची कशी कराल निवड?

**दि.२१विदर्भ प्रजासत्ताक**

भाजीपाला पिकांना वर्षभर मागणी असते. मागणीनुसार पुरवठा करण्यासाठी वर्षभर उत्पादन घेता येणाऱ्या व कमी कालावधीत येणाऱ्या भाजीपाला पिकांची लागवड सोईस्कर ठरते.

कमी कालावधी म्हणजेच लागवडीपासून दीड ते दोन महिन्याच्या आत काढणीस किंवा पहिल्या कापणीस येणारी भाजीपाला पिके होय. यामध्ये प्रामुख्याने पालेभाज्या पिकांचा समावेश होतो.



मेथी, कोथिंबीर, पालक, शेपू, चुका, चाकवत, मुळा, राजगिरा, लेट्युस ही कमी कालावधीत येणारी भाजीपाला पिके आहेत.

फक्त पुरवठा करणे हा या भाजीपाला पिकांच्या लागवडीचा उद्देश नसून त्यासोबत आहारातील त्यांच्या नियमित समावेशाने होणारे फायदेदेखील महत्वाचे आहेत.

### पालेभाज्या पिकांची काढणीनुसार नियोजन

| पीक | कालावधी | काढणी | उत्पादन |
|---|---|---|---|
| आंबट चुका | पेरणीनंतर ५० ते ६० दिवसांनी काढणीसाठी तयार होतो. | जमिनीलगत कापणी करावी. चार ते पाच तोडे मिळतात. | १५ ते २० टन/हे. |
| चाकवत | पेरणीनंतर ३५ ते ४० दिवसांनी काढणीसाठी तयार होतो. | कापून किंवा उपटून काढावे. | १० ते १५ टन/हे. |
| पालक | पेरणीनंतर ३० ते ४० दिवसांनी कापणीसाठी तयार होतो. | १५ ते ३० से.मी. उंचीची हिरवी कोवळी पाने जमिनीपासून ५ ते ७.५ से.मी. भाग ठेवून कापावीत. दर १५ दिवसांनी कापणी करावी. ३ ते ४ कापण्या होतात. | ५० ते २० टन/हे. |
| शेपू | पेरणीनंतर ५० ते ६० दिवसांनी काढणीसाठी तयार होतो. | कापून किंवा उपटून काढावे. जुड्या बांधून विक्री करावी. | ५० ते २० टन/हे. |
| मेथी | पेरणीनंतर ३० ते ३५ दिवसांनी काढणीसाठी तयार. | मेथीचा दोन ते तीन वेळा खोडवा घेता येतो. | ७ ते ८ टन/हे. |
| कोथिंबीर | पेरणीनंतर फुले येण्यापुर्वी कोथिंबीरीची काढणी करावी. | कापून किंवा उपटून काढावे. | १० ते १५ टन/हे. |
| राजगीरा | पेरणीनंतर २५ ते ३० दिवसांनी काढणीसाठी तयार. | कापून किंवा उपटून काढावे. | २० ते ३० टन/हे. |
| मुळा | पेरणीनंतर ४० ते ५५ दिवसांनी काढणीसाठी तयार. | कोवळी मुळे उपटून काढावीत व पाण्याने स्वच्छ धुवावीत. | १० ते २० टन/हे. |
| लेट्यूस | पेरणीनंतर ४० ते ५० दिवसांनी काढणीसाठी तयार. | नुसत्या पानांची पाने कोवळी असताना तर गड्ड्यांची काढणी गड्डा पूर्ण वाढल्यानंतर करावी. पाने, गड्डा धारदार चाकूने कापून काढावीत. | २५ ते ३० टन/हे. |




## सांभाळा तुमचं हृदय! थंडीच्या ऋतूत हृदयविकाराचा झटका येण्याची शक्यता अधिक

**दि.२१विदर्भ प्रजासत्ताक**

तापमानाचा पारा घसरत निघाला असून थंडीची तीव्रता वाढत आहे. हा गारठा तरुणपिढीसाठी आल्हाददायक असला तरी हृदयविकार असणार्यांसाठी काळजीचा आहे. याचे कारण थंडीच्या ऋतूत हृदयविकाराचा झटका येण्याची शक्यता अधिक असते, असे अभ्यासातून दिसून आले आहे.



पूर्वीच्या काळी वयाची पन्नाशी–साठी ओलांडलेल्या व्यक्तींमध्ये हृदय विकाराचे प्रमाण अधिक आढळून येत असे; पण आजकालच्या ताणतणावाच्या वातावरणात हृदयविकार हा कोणालाही होऊ शकतो. आज आपण ऐन तिशी–पस्तीशीतील तरुणही हृदयविकाराच्या झटक्याने मरण पावल्याचे आपण ऐकत असतो; पण साधारण वयाच्या पन्नाशीनंतर हृदयाशी संबंधित आजारांचे प्रमाण वाढते. त्यापैकी कोरोनरी हार्ट डिसीज, हायपरटेंशन, स्ट्रोक किंवा अर्धांगवायू, औषधांच्या साइडइफेक्टमुळे होणारा अर्हीथमियस, कॉंन्जेस्टीव हार्ट फेल्युअर, व्हेरीकोज व्हेन्स, ॲथेरोस्ल्कीरॉसिस म्हणजे रक्तवाहिन्यांचे अरुंद होतात, त्याचबरोबर रक्तवाहिन्यांच्या भिंती कमजोर होतात आणि त्यातील एखादी रक्तवाहिनी फुटली तर हार्ट अ‍ॅटॅक किंवा अर्धांगवायू होण्याची शक्यता असते. काही वेळा अशा प्रकरणांमधे रुग्णाचा अचानक मृत्यूही यऊ शकतो. सामान्यतः ज्येष्ठ नागरिक, महिला आपली दुखणी फारशा गांभीर्याने घेत नाहीत असे दिसून येते; मात्र त्यामुळे हृदयविकार बळावत जातो. यासाठी काही लक्षणांकडे जास्त लक्ष देणे आवश्यक आहे. दिवसभर दमल्यासारखे वाटणे, खूप घाम येणे ही काही अशी छुपी लक्षणे आहेत ज्यामुळे छातीत न दुखताही हृदयविकाचा झटका येऊ शकतो. ही लक्षणे जास्त करून मधुमेह असणार्या रुग्णांमध्ये जास्त आढळतात. खूप थंडी किंवा खूप गरम तापमानात हृदयाची हालचाल खूप जलद आणि अनियमित झाल्यामुळेही हृदयविकार येण्याचा धोका असतो. आपल्या जोडीदाराचा किंवा जवळच्या मित्राचा आजार, अपंगत्व, किंवा मृत्यूमुळे ताण येऊन मानसिक स्थितीचा असमतोल झाल्यामुळेही हृदयविकाराचा झटका येऊ शकतो.ज्या व्यक्तींना किडनीचे गंभीर आजार आहेत त्यांचा रक्तदाब हा नेहमीच वाढलेला असतो. त्यांनाही हृदयविकाराची येण्याची शक्यता असते. चयापचय प्रक्रियेत ग्लूकोजच्या वाढलेल्या प्रमाणामुळे, स्थूलपणामुळे, एलडीएल कोलेस्टेरॉलच्या वाढलेल्या प्रमाणामुळे, ट्रायग्लीसराइडचे प्रमाण वाढल्यामुळे, आणि उच्च रक्तदाबामुळे हृदयविकाराची शक्यता वाढते. त्याचबरोबर इन्फ्लूएंझासारख्या आजारातही हृदयविकाची शक्यता असते.छातीत दुखणे, छातीवर दबाव आल्यासारखे वाटून अस्वस्थ वाटणे, श्वास कमी पडणे, हृदयाची धडधड वाढणे, हृदयाचे ठोके अनियमित पडणे, शुद्ध हरपणे, खूप दमल्यासारखे वाटणे, घाम येणे ही हृदयविकार येतानाची काही लक्षणं आहेत.

# मधमाशांच्या हल्ल्यामध्ये रामगावच्या ८ महिला जखमी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२१धामणगाव रेल्वे–** तालुक्यातील गंगाजळी शेत शिवारात कापसाची वेचणी करत असताना मधमाशांनी केलेल्या हल्ल्यात रामगाव येथील आठ महिला जखमी झाल्या आहेत. जखमी महिलांना उपचारासाठी येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. –तर तीन महिला गंभीर जखमी –झाल्याने त्यांना अमरावती रुग्णालयात पाठवण्यात आले आहे. ही घटना – शुक्रवारी (दि. २०) घडली आहे.तालुक्यातील गंगाजळी – शेतशिवारातील एका शेतात रामगाव – येथील १५ महिला कापूस वेचणी करण्यासाठी गेल्या होत्या. सकाळीसाडेदहा वाजताच्या सुमारास परिसरात असणाऱ्या मधमाशांनी अचानकपणे या महिलांवर हल्ला केला. या हल्लद रेखा मोरेश्वर डोंगरे, अर्चना नरेश काळबांडे, वंदना रमेश पाटील, वैशाली श्रीधर निकोसे, रंजना संजय मडामे, ललिता गजानन मडामे, स्वाती गौतम घोडेस्वार या आठ महिला जखमी झाल्या. मधमाशांच्या हल्ल्याची माहिती मिळताच रामगावचे नागरिक धावून आले. जखमींना धामणगाव ग्रामीण रुग्णालयात आणले. त्यानंतर तीन महिलांना डॉक्टरांनी अमरावतीला पाठवले आहे. तर पाच महिलांवर येथील ग्रामीण रुग्णालयात उपचार करून सुटी देण्यात आली.

# भारतीय गुणवत्ता परिषदेची चांदूर बाजार तालुक्यातील देऊरवाडा आणि विश्रोडी गावातील संदर्भात क्षेत्रिय पडताळणी भेट पूर्ण

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२१ चांदूर बाजार–** भारतीय गुणवत्ता परिषद यांच्या कडून राहुल मिश्रा यांनी चांदूर बाजार तालुक्यातील ग्रामपंचायत देऊरवाडा आणि विश्रोडी या गावांतील अटल भूजल योजना अभिसरण अंतर्गत सादर करण्यात आलेल्या ठिबक सिंचन, तुषार सिंचन , नैसर्गिक आच्छादन, जैविक आच्छादन, शेडनेट, इत्यादी उपाय योजनांना भारतीय गुणवत्ता परिषदे अंतर्गत पाहणी करण्यात आली व ग्रामपंचायत मधील सरपंच, सचिव, पा. पु. स्वच्छता समिती अध्यक्ष, सदस्य, लाभार्थी शेतकरी, ग्रामस्थ व इतर यंत्रणा यांच्याशी योजनेबद्दल प्रश्नोत्तराच्या माध्यमातून तपासणी करण्यात आली. तसेच भूजल माहिती केंद्राला सुद्धा भेट देण्यात आली. यावेळी जिल्हा प्रकल्प व्यवस्थापन कक्षाचे जलसंधारण तज्ञ सचीन चव्हाण व कृषी तज्ञ वैभव इंझळकर जिल्हा अंमलबजावणी भागिदार संस्थेचे जिल्हा समन्वयक अधिकारी लोकप्रिय मेश्राम,माहिती शिक्षण आणि संवाद तज्ञ प्रविण फुकट,जलसंधारण तज्ञ श्री क्षितिज पाटील, कृषी तज्ञ ऋषिकेश तायडे, समुह संघटक सौ. कल्पना वानखडे, सौ.सविता कुऱ्हाडे आणि श्री सुयोग वाटकर ग्रामपंचायतीचे सरपंच मॅडम, सदस्य लाभार्थी शेतकरी व गावातील नागरिक यावेळी उपस्थित होते.



# विदर्भ प्रजासत्ताक
शनिवार दि. २१ डिसेंबर २०२४ शहर/ग्रामिण


# आगामी मनपा निवडणुकीत ६० नगरसेवक निवडून येतील - प्रविण पोटे पाटील

## शहरातील विविध पक्षातील शेकडो पदाधिकारी व कार्यकर्त्यांचा अमरावती भाजपा मध्ये जाहीर प्रवेश

### पोटे पाटील यांचे उत्कृष्ट संघटन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अमरावती**

महाराष्ट्राचे लाडके मुख्यमंत्री देवेन्द्रजी फडणवीस साहेब यांच्या नेतृत्वात महाराष्ट्रामध्ये भारतीय जनता पार्टीने घवघवीत यश संपादन केले महायुती सरकारच्या योजना, सरकार ने केलेली विकास कामे यांच्या जोरावर महाराष्ट्रात महायुतीचे सरकार स्थापन होऊन आपले लाडके देवाभाऊ पुन्हा मुख्यमंत्री झालेत. तसेच विधानसभेत अमरावती व बडनेरा सह जिल्हयातील आठ पैकी सात जागेवर भाजपा व महायुतीच्या पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी केलेल्या अहोरात्र मेहनतीमुळे महायुतीचे सात उमेदवार निवडून आले असून यातील पाच जागा भाजपा व दोन मित्रपक्षांच्या आहेत. अमरावतीमध्ये भाजपा च्या वतीने असंख्य विकास कामे झालीत नगरसेवक , पदाधिकारी, कार्यकर्ते यांनी जनतेच्या समस्या जाणून त्याचे निराकरण केले, सरकारच्या योजना सर्वसामान्यांपर्यंत



पोहचविल्यात, शहराच्या विकासाकरिता भाजपाच जनतेला पाहिजे असून आगामी मनपा निवडणुकीत ६० नगरसेवक निवडून येतील असा विश्वास भाजप नेते प्रविण पोटे पाटील यांनी जनसंपर्क कार्यालय येथे आयोजित पदाधिकारी व कार्यकर्ता मेळाव्यात व्यक्त केला.

भारतीय जनता पार्टी अमरावती शहर जिल्हा अध्यक्ष यांचे विधानसभा निवडणुकीतील उत्कृष्ट संघटन तसेच पदाधिकारी, कार्यकर्ते यांची मेहनतिच्या जोरावर भाजपा ने मोठे यश संपादन केले, तसेच मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांचा विकासात्मक दृष्टिकोन पाहता आज भारतीय जनता पार्टी अमरावती शहर मध्ये भाजपा शहर अध्यक्ष मा. आ. प्रविण पोटे पाटील यांच्या नेतृत्वात अमरावती शहरातील विविध पक्षातील शेकडो पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी जाहीर रीत्या प्रवेश केला यात शिवसेना उबाठा च्या स्वातीताई निस्ताने, राष्ट्रवादी शरद पवार गटाचे अमरावतीचे माजी महापौर श्री प्रविणजी काशीकर सह अनेक मान्यवर पदाधिकारी व कार्यकर्त्यांचा सहभाग आहे.

त्याचप्रमाणे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाल्यानंतर मा. देवेन्द्रजी फडणवीस पहिल्यांदाच अमरावती मध्ये येत असून त्यांच्या स्वागताच्या जय्यत तयारी बद्दल चर्चा करण्यात आले तसेच भाजपा सदस्य नोंदणी अभियान अंतर्गत जास्तीत जास्त सदस्य जुळवण्याकरिता मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी जयंतजी डेहनकर, शिवरायजी कुळकर्णी, निवेदिताताई दीघडे, चेतनजी पवार, विवेक कलोती, अनिताताई राज, कौशिक अग्रवाल, गंगाताई खारकर, लखन राज सह भाजपा पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते-

# राज्यातील मेंढपाळांच्या समस्यांचे मुख्यमंत्र्यांपुढे आव्हान

## वाढत्या समस्यांवर तोडगा काढण्यासाठी मेंढपाळांचे देवेंद्र फडणवीसांना निवेदन



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अमरावती-** राज्यात महायुतीचे सरकार आले आणि देवेंद्र फडणवीसांनी मुख्यमंत्रीपदाची शपथ देखील घेतली.राज्यातील अनेक संकटांचा सामना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना करावयाचा आहे यामध्ये राज्यातील मेंढपाळांच्या समस्यांचे देखील मोठे आव्हान फडणवीसांपुढे असून राज्यातील मेंढपाळ बांधवांनी नुकतेच देवेंद्र फडणवीस यांना निवेदन देऊन मेंढपाळांच्या समस्यांवर तोडगा काढण्याची विंनंती केली आहे. शेळी-मेंढी पालन करून मेंढपाळांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालतो. पशुपालनाशिवाय दुसरे कोणतेही उदरनिर्वाहाचे ठोस साधन नाही अश्या विपरीत परिस्थितीत आणि वाढत्या महागाईमध्ये मेंढपाळ बांधव शेळी मेंढी पालन करत असून या सर्व महागाईचा व शासनाच्या कुटील धोरणाचा फटका मेंढपाळांना बांधवांना बसत आहे. शेळी मेंढीच्या आरोग्याचा तसेच विमा कवच देऊन त्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न आजही ऐरणीवर असून यामध्ये मात्र राज्य शासन कुचकामी ठरत आहे. मेंढपाळांना आजही घरकुल योजनेचा लाभ नाही किंवा त्यांच्या पाल्यांना कोणत्याही शैक्षणिक सुविधा किंवा वसतिगृहाचा लाभ देखील मिळत नाही. भारताचे नागरिक असून सुद्धा केवळ मतांपुरता आमचा उपयोग घेतला जात असल्याचा आरोप मेंढपाळ बांधवांनी केला आहे.याशिवाय आपल्या निवेदनात मेंढपाळ बांधवांनी बाहेर राज्यातील कायम स्थानांतरित मेंढपाळांना चराईबंदी करण्यात यावी, जेणे करून त्यांच्यापासून होणाऱ्या रोग-राईपासुन पशुंचा बचाव होईल,भारतीय वन कायदा १९२७ अन्वये बंदी घातलेले वनराई अधिकार उठवावे,शेळया मेंढ्यांच्या आकस्मिक मृत्यूची नुकसान भरपाई मिळावी,मेंढपाळ समुहाला वन हक्क अधिनियम २००६ अंतर्गत चराई करीता कुरणे विकास धोरणे राबविण्यात यावे, मेंढपाळ बांधवा वरील अन्याय थांबून खोटया केसेस मागे घेण्यात याव्या, मेंढपाळ बहुल तालुक्यात शेळया मेंढयाचे मोबाईल हॉस्पीटल तयार करण्यात यावे, नैसर्गिक आपत्ती पासून संरक्षणा करीता मेंढपाळ कुंटुबांना अत्याधुनिक तंबू, साहीत्य, औषध वितरीत करण्यात यावे.मेंढपाळ बांधवांच्या शेळयामेंढ्याचा १ रुपया प्रमाण विमा कवच उपलब्ध करुन दयावे, अमरावती विभागात पशूनिहाय पशुगणना करावी,मेंढपाळ बांधवांच्या संपूर्ण शेळया मेंढयाचे दर तिन महिन्यांनी आरोग्य तपासणी करण्यात यावी,शासनाने ठरवून दिलेल्या कालावधीत आजारनिहाय शेळी-मेंढी लसीकरण शिबीरे आयोजीत करण्यात यावे,मेंढपाळाच्या मुलांसाठी वसतीगृह निर्मीती करणे व चांगल्या शैक्षणीक सुविधा द्याव्यात,मेंढपाळांना विशेषबाब म्हणून घरकुल उपलब्ध करून स्थायी निवारा देण्यात यावा,आंतरराज्यीय सिमेवर असणारे पशुसंवर्धन विभागाचे तपासणी नाके (चेकपोस्ट) वरील झालेल्या कार्यवाहीचा मागील दोन वर्षाचा वस्तुनिष्ठ अहवाल याबाबत पाठपुरावा करावा अश्या मुख्य मागण्या मेंढपाळ बांधवांनी केलेल्या आहे.मेंढपाळांच्या निवेदनाची गांभीर्याने ८ दिवसाच्या आत दखल घेऊन योग्य कार्यवाही न केल्यास विभागीय आयुक्त कार्यालयासमोर वाडा आंदोलन करण्याचाइशारा सुद्धा यावेळी मेंढपाळ बांधवांनी दिला आहे.

# भारत जोडो यात्रेत सहभागी त्या अर्बन नक्षली संघटनांची यादी द्या

## कॉंग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोलेंची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांकडे पत्र लिहून मागणी



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१नागपूर -** अखिल भारतीय कॉंग्रेस कमिटीचे माजी अध्यक्ष खासदार राहुल गांधी यांच्या भारत जोडो यात्रेत समाविष्ट झालेल्या विविध संघटना राज्याच्या व लोकशाहीच्या विरोधात काम करणाऱ्या व अर्बन नक्षलवाद माजवणाऱ्या होत्या, असा आरोप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधिमंडळात राज्यपालांच्या अभिभाषणावरील केला आहे. भारत जोडो यात्रेत सहभागी झालेल्या त्या अर्बन नक्षली संघटनांची व त्या संघटनेच्या प्रमुखांची यादी द्यावी, अशी मागणी प्रदेश कॉंग्रेसचे अध्यक्ष नाना पटोले यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहून केली आहे.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पाठवलेल्या या पत्रात पुढे असे म्हटले आहे की, पुरोगामी महाराष्ट्रात विविध सामाजिक संघटना अनेक वर्षांपासून समाजोपयोगी कामे करत असून राज्यातील गोरगरिब व सर्वसामान्य नागरिकांच्या हितासाठी काम करत आहेत. राज्यात व देशात लोकशाही भक्कम व्हावी यासाठी अशा संघटना कार्यरत आहेत. अशा सामाजिक संघटनांसह विचारवंत, ज्येष्ठ नागरिकही भारत जोडो यात्रेत सहभागी झाले होते. अशा संघटनांना राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी नक्षलवादी संबोधणे अत्यंत चुकीचे आहे. भारत जोडो यात्रेला संघटनांनी प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष मदत केली त्या विविध संघटनांचे दाखले देत त्या संघटना नक्षलवादी आहेत असे संबोधले त्या संघटना व संघटना प्रमुखांची यादी आम्हाला द्यावी अशी मागणी पटोले यांनी केली आहे.

# मोर्शी विधानसभेचे आमदार उमेश यावलकर यांनी सभागृहात उपस्थित केला संत्रा प्रक्रिया प्रकल्पाचा प्रश्न

## मोर्शी मतदार संघात साकारणार भव्य संत्रा प्रक्रिया प्रकल्प

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१नागपूर-** मोर्शी विधानसभा मतदार संघाचे नवनिर्वाचित आमदार उमेश यावलकर यांनी संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना प्रश्न प्रकर्षाने सभागृहात उपस्थित केला. वरुड मोर्शी तालुक्यात सर्वाधिक संत्रा बागायतदार शेतकरी वर्ग आहे. परंतू मतदार संघात अद्यापही संत्रा प्रक्रीया प्रकल्प नसल्याने शेतकऱ्यांना संत्रा बेभाव विकावा लागतो. त्यामुळे मतदार संघात संत्रा प्रकीया प्रकल्प निर्माण करण्याची मागणी विधानसभेत लावून धरली. संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना प्रश्नावर भर देऊन तातडीणे निकाली काढण्याबाबत मंत्रालयीन स्तरावर तातडीणे बैठक बोलावून संत्रा प्रकल्प सुरु होण्याचे अनुषाने कार्यवाही प्रस्तावित करण्याचा प्रश्न उपस्थित केला.

मोर्शी मतदार संघातील ठाणाठुनी तालुका मोर्शी येथे सन २०१८ मध्ये मेक इन इंडिया अंतर्गत जैन इरिगेशन सिस्टम लिमिटेड व कोकाकोला इंडिया तसेच महाराष्ट्र शासन अंतर्गत सामंजस्य करार करार करण्यात आला होता. दरम्यान संत्रा प्रक्रिया प्रकल्पाचे उद्घाटन माननीय मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांचे उपस्थित संपन्न झाले होते. यावेळी प्रकल्पाच्या पायाभूत सुविधे करीता शासन स्तरावर कारवाई करण्यात आली होती, परंतु अद्यापही येथे कोणतेही प्रकारची सुविधा उपलब्ध नसल्याची बाब सभागृहात उपस्थित केली.



सदर्हू प्रकल्प अंदाजे सहाशे कोटी रुपये रकमेचा असून या प्रकल्पाची गाळण क्षमता ३०० टन प्रति दिवस आहे. त्यामुळे प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरीत्या हजारो मजूरांना प्रक्रीया प्रकल्पाच्या माध्यमातून रोजगार उपलब्ध होऊ शकणार आहे. या प्रकल्पाकरिता १०० एकर जागा अधिग्रहीत करण्यात आली मात्र पूढील प्रकीया शासन स्तरावरुन पूर्ण झाली नसल्याने प्रकल्प अध्यापही अपुर्णावस्तेत आहे. परिणामी संत्रा उत्पादक शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आणून दिली. मोर्शी मतदार संघात संत्रा उत्पादक शेतकरी मोठ्या प्रमाणात होत असून सदर्हू प्रकल्प तातडीणे सुरु करण्यासंदर्भात शासनाकडे बैठक लावून सातत्याने पाठपुरावा सुरु ठेवणार असल्याच्या प्रतिक्रीया प्रसार माध्यमांशी बोलतांना व्यक्त केल्या-

# करीनाच्या धाडसाची दखल घेत ‘प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कार’ जाहीर

## २६ डिसेंबर रोजी राष्ट्रपतींच्या हस्ते दिल्लीत होणार गौरव

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अमरावती -** आग लागलेल्या फ्लॅटमध्ये स्वतःला झोकुन देत सिलेंडर बाहेर काढून जय अंबा अपार्टमेंटच्या ७० कुटुंबांचे रक्षण करणाऱ्या करिना थापाच्या धाडसी वृत्तीची दखल घेऊन केंद्रीय महिला व बाल विकास मंत्रालयाने प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कारासाठी तिची निवड केली आहे. येत्या २६ डिसेंबर रोजी राष्ट्रपतींच्या हस्ते राष्ट्रपती भवनात एका शानदार समारंभात तिला या मानाच्या राष्ट्रीय पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे.

धुरांचे लोट, गरम टाईल्स आणि श्वास गुदमरवणाऱ्या स्थितीचा यशस्वी सामना करून आपले अपार्टमेंट आगीपासून वाचविण्याच्या ध्येयाने धाडसाचा परिचय देणाऱ्या करीना थापाचे (वय १७ वर्ष) राष्ट्रीय पुरस्कार जाहीर झाल्याने सर्वत्र कौतुक होत आहे.समयसूचकता व धाडसाच्या जोरावर तिने सिलेंडरचा स्फोट होण्यापासून थांबवला व भीषण अपघातातून अपार्टमेंटचे रक्षण केले.

शिखांचे दहावे गुरू गुरु गोविंद सिंग यांचे पुत्र साहिबजादा जोरावरसिंह आणि साहिबजादा फतेहसिंह यांनी देशासाठी दिलेल्या प्राणांच्या आहुतीचे स्मरण म्हणून २६ डिसेंबर रोजी देशात ‘वीर बाल दिवस’ साजरा केला जातो. याच औचित्याने केंद्रीय महिला व बाल विकास मंत्रालयाच्यावतीने प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कार प्रदान करण्यात येतात. शौर्य, क्रीडा, समाजसेवा, विज्ञान-तंत्रज्ञान, पर्यावरण, कला व संस्कृती आणि संशोधन क्षेत्रामध्ये कतृत्वाची छाप सोडणाऱ्या भारतातील मुला-मुलींची विविध निकषांच्या आधारे निवड केली जाते. राष्ट्रपतींच्या हस्ते या मानाच्या पुरस्काराने गौरविण्यात येते. पदक, सन्मानचिन्ह आणि प्रमाणपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.



कठोरा परिसरातील पोद्दार इंटरनॅशनल स्कुल शेजारील जय अंबा अपार्टमेंटमध्ये १५ मे २०२४ च्या सायंकाळी ६.०० वाजता ही दुर्घटना घडली. अपार्टमेंटच्या 'बी-विंग' मधील दुसऱ्या माळ्यावरील फ्लॅटमधून धूर निघत असल्याचे दिसताच घरकाम करणाऱ्या करीना थापाने बंद असलेल्या शेजारच्या फ्लॅटचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. मात्र, आग आणि धुराचे लोट येत असतानाही पाण्याच्या बादल्यांचा सतत मारा करत तीने सिलेंडर शेजारील आग पूर्णपणे आटोक्यात आणत सिलेंडर बाहेर काढले.अशात सिलेंडरचा स्फोट कधीही होऊ शकला असता. करीनाच्या समय सूचकतेमुळे मोठा अनर्थ टळला व अपार्टमेंटचे रक्षण झाले.

या सर्व घटनाक्रमात धाडस व समयसूचकतेचा परिचय देणाऱ्या करिनाच्या या अनन्यसाधारण कार्याची दखल घेत जिल्हा महिला व बाल विकास विभागाद्वारा जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत केंद्रीय महिला व बालविकास मंत्रालयाला पुरस्कारासाठी प्रस्ताव पाठविण्यात आला.सर्व निकषांती प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कारासाठी तिची निवड झाली.

# ला.राजुरा प्रकल्पबाधित मजूर,कुटुंब व शेतकऱ्यांचे उपोषण

## अधिकारी,आमदार व उपोषणकर्त्यांमध्ये समनवय साधून आणला

### भाजपा नेते गोपाल तिरमारेंची उपोषण स्थळी भेट

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१चांदूर बाजार -** कृषी व संघर्ष समिती,लघु मध्यम प्रकल्प च्या वतीने गेल्या पाच दिवसांपासून प्रकल्प बाधित मजूर, कुटुंब व शेतकऱ्यांचे बेमुदत साकडी उपोषण सुरु असून भाजपा नेते गोपाल तिरमारे यांनी उपोषण स्थळी भेट देत अचलपूर मतदार संघाचे आमदार प्रवीण तायडे,अमरावती मध्यम प्रकल्प कार्यकारी अभियंता सु.आडे व उपविभागीय अभियंता पालवे आणि उपोषणकर्त्यांमध्ये समनवय साधून आणला गेल्या सन-२००९ च्या प्रशासकीय मान्यते प्रमाणे मंजूर असलेले पुनर्वसन निच्छित करून द्यावे, राजुरा प्रकल्प बाधित शेत जमीनिच्या दरात योग्य वाढ करून जमीनिचे भुसंपादन त्वरित करुन द्यावे व राजुरा प्रकल्पा मध्ये गावातील लहान



मुलाचा पाण्यात बुडून मृत्यु झालेल्या कुटुंबास आर्थिक मोहबदला देण्यात यावी व प्रकल्प बाधित क्षेत्रा मध्ये जे क्षेत्र पूर्णपणे संपाधित नसेल व वहिवाटीचा रास्ता बुडीत क्षेत्रात जात असेल त्याच्यासाथी रस्त्याची तरतूद करून द्यावी यासह प्रकल्पाचे काम चालू असल्यामुळे तेथे रोजगार स्थानिकांना देण्यात यावा अशा विविध मागण्या पूर्ण करण्यासाठी उपोषणकर्ते प्रकल्प बांधकाम स्थळीच तळ ठोकून बसले आहेत माजी आमदार बच्चु कडू यांनी पाठपुरवा करण्यासाठी दुर्लक्ष केले होते त्यामुळे आम्हाला उपोषण करण्याची वेळी आली असा आरोप यावेळी उपोषणकर्त्यांनी केला दिनांक १९ डिसेंबर रोजी अमरावती मध्यम प्रकल्प कार्यकारी अभियंता सु.आडे व उपविभागीय अभियंता पालवे यांनी उपोषणकर्त्यांची भेट घेतली व स्थानिक तलाठी यांच्या कडून अहवाल मागविण्यात आला आणी लवकरच मागण्या पूर्ण करू अशे आश्वासन दिले.

### आमदार प्रवीण तायडे यांच्या मध्यस्थीने कार्यवाही होणार

प्रकल्प बाधित उपोषणकर्त्यांच्या मागण्या रास्त असून माजी आमदार बच्चु कडू यांनी त्यांच्या कार्यकाळात पाठपुरवठा कार्यासाठी दुर्लक्ष केले होते त्यामुळे सदर मागण्या प्रलंबीत आहे माननीय आमदार प्रवीण तायडे व वरिष्ठ अधिकारी आणि उपोषणकर्त्यांमध्ये समनवय साधून आनला असून लवकरच आमदार प्रवीण तायडे यांच्या मध्यस्थीने योग्य कार्यवाही होणार व उपोषण मागे घेण्याची विनंती केली.

**गोपाल पां. तिरमारे**
(जि.सं.पंचायतराज व ग्रामविकास भाजपा)

# डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती पुरस्कारासाठी केंद्रीय मंत्री नितीन गडकरींची निवड

## हर्षवर्धन देशमुख यांची पत्रकार परिषदेत माहिती दोन उत्कृष्ट महिला शेतकऱ्यांचा होणार सन्मान

## डॉ. पंजाबराव देशमुख यांचा १२६ वा जयंती उत्सव

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अमरावती**

श्रीशिवाजी शिक्षणसंस्थेतर्फे दिल्या जाणाऱ्या प्रतिष्ठेच्या 'डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती पुरस्कारासाठी यावर्षी केंद्रीय दळणवळण व रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांची निवड करण्यात आल्याची माहिती श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख यांनी एका पत्रकारपरिषेदत शुक्रवारीदिली. पाचलक्षरोख, स्मृतिचिन्ह, मानपत्र, शाल व श्रीफळ असेया पुरस्काराचे स्वरूप आहे.

हर्षवर्धन देशमुख म्हणाले की, शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांचा १२६ वा जयंती उत्सवानिमित्त २७ डिसेंबरला आयोजित मुख्य सोहळ्यात हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. या पुरस्कारा व्यतिरिक्त यावर्षीपासून विदर्भातील दोन उत्कृष्ट शेतकरी महिलांना या सोहळ्यात पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येईल. भाऊसाहेबांच्या जन्मदिनी शुक्रवार २७ डिसेंबरला सकाळी ९ वाजता



जयंती उत्सवाचा मुख्य सोहळा श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालयाच्या भव्य प्रांगणात आयोजित केला आहे. सोहळ्याला केंद्रीय दळणवळण व रस्ते वाहतूक मंत्री ना. नितीन गडकरी मुख्य अतिथी म्हणून उपस्थित राहणार असून त्यांना या वर्षीचा 'डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यातयेईल. शरद पवार यांनी दिलेल्या दाननिधीतून विदर्भातील निकृष्ट शेतकरी महिलेला 'शारदाबाई पवार उत्कृष्ट महिला शेतकरी पुरादाबाई पवार श्री शिवाजी शिक्षण संस्थेस्क वतीने श्रीमती विमलाताई देशमुख उत्कृष्ट महिला शेतकरी पुरस्कार' असे दोन पुरस्कार उत्कृष्ट महिला शेतकऱ्यांना दिल्या जाणार आहेत. रोख रु.१,११,१११/- (रुपये एक लक्ष अकरा हजार एकशे अकरा), स्मृतिचिन्ह, सन्मानपत्र, केंद्र सरकारने डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या १२५ व्या जयंती प्रित्यर्थ प्रसारित केलेले १२५ रुपयांचे नाणे, साडी, चोळी, शाल व श्रीफळ असे पुरस्काराचे स्वरूप आहे.शारदाबाई पवार उत्कृष्ट महिला शेतकरी तर रु.५१०००/- राम्र स्मृतिचिन्ह, साडी, चोळी, शाल व श्रीफळ असे 'श्रीमती विमलाताई देशमुख कर महिला शेतकरी पुरस्काराचे स्वरूप आहे. विदर्भातील महिला शेतकऱ्यांसाठीचा हा सर्वात मोठा सन्मान आहे. या सोहळ्यात माध्यमिक शाळेतील खेळाडू विद्यार्थी व विद्यार्थिनीला क्रीडाक्षेत्रातील उल्लेखनीय प्राविण्याबद्धल ' डॉ.पंजाबराव देशमुख क्रीडारत्न पुरस्कार देखील प्रदान करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.शुक्रवार २७ डिसेंबरला सकाळी ८ ते ९ यावेळात डॉ. पंजाबराव देशमुख स्मृतीस्थळावरील भाऊसाहेबांच्या पूर्णाकृती पुतळ्याला पुष्पांजली अर्पण करून मानवंदना देण्यात येईल.

सकाळी नऊ वाजता श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालयाच्या भव्य प्रांगणात मुख्य सोहळ्याला प्रारंभ होईल. सोहळ्याला केंद्रीय दळणवळण व रस्ते वाहतूक मंत्री ना.नितीनजी गडकरी हे मुख्य अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत.

# महानुभव आश्रम शतकपूर्ती महोत्सव

## भव्य संत महंताच्या शोभायात्रेने अंबानगरी दुमदुमली

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अमरावती**

महानुभाव आश्रम राजापेठ कंवरनगर अमरावती या आश्रमास शंभर वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त २० ते २२ डिसेंबर दरम्यान शतकपूर्ती महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या तिन दिवसीय सोहळ्याच्या पहिल्या दिवशी शुक्रवारला सायंस्कोर मैदान ते कंवरनगर महानुभाव आश्रमापर्यंत संतमहंतांची भव्य शोभायात्रा काढण्यात आली. या शोभायात्रेत पालखी, बग्गी, घोडे, बँडबाजासह हजारो महानुभाव सहभागी झाले होते. यावेळी ठिकठिकाणी शोभायात्रेचे पुष्पवर्षाव तसेच फटाक्यांची आतषबाजी करून स्वागत करण्यात आले. जय श्रीकृष्ण... जयघोष आणि सुमधुर भजनांनी अंबानगरीदुमदुमली होती.

या भव्य दिव्य अश्या शोभायात्रेचा शहरातील सायन्सकोर मैदान येथून कवीश्वर कुलाचार्यमहंत श्री कारंजेकर महानुभाव, नितीन भेटाळू यांच्या नेतृत्वात शुभारंभ झाला. या शोभायात्रेमध्ये मुख्य आकर्षण म्हणजे, तीन आलेले रथावर स्वार विविध ठिकाणावरून आले संतमहंत, रथांवर आकर्षत विद्युत रोषणाई, धुळे येथील कन्हैया बँडपार्टी दोनउंट, पाचघोडे, १० ट्रॅक्टर, पालखी, दिंडी, भजनी मंडळ आदी शोभायात्रेचे विशेष आकर्षण होते. सर्वप्रथम पुढे धुळे येथील बँड, त्यानंतर पहिल्या नंबरच्या श्रीकृष्णांची भव्य





प्रतिमा, मागील एकएका ट्रॅक्टरवर श्री चक्रधर स्वामी, दत्तात्रय प्रभू, श्री गोविंद प्रभू यांची प्रतिमा तर काही ट्रॅक्टर विविध भागातून आलेले महानुभाव विराजमान झाले होते.

तीन रथांमध्ये संतमहंत स्वारशोभायात्रेतील सर्वात महत्वाचे असलेल्या तीन रथावर विविध भागातील संत महंत आरुढ झाले होते. यात परभणी येथील महंत लासुरकर बाबा, रिद्धपूर येथील महंत यशदेव बाबा, महंत बिडकर बाबा, धुळे येथील महंत सावळकर बाबा, रणाई येथील महंत जामोदकर बाबा आदीसंतमहंत शोभायात्रेत सहभागी झाले होते.

# हरिसाल ते चौराकुंड मार्गावर पट्टेदार वाघाचे दर्शन

## निसर्गप्रेमी आनंदित तर ग्रामस्थ दहशतीत

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२१धारणी** – धारणी तालुक्यातील हरीसाल ते चौराकुंड मार्गावर मुक्तपणे पट्टेदार वाघ फिरत असताना प्रवाशांनी व व्याघ्र प्रकल्पाच्या अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष पाहिले. त्यामुळे परिसरात खळबळ उडाली आहे. ग्रामस्थांमध्ये दहशत पसरली असली तरी पर्यावरण प्रेमी मात्र आनंद व्यक्त करीत आहेत.धारणीपासून ३० किलोमीटर अंतरावर हरीसालच्या जंगलात १९ डिसेंबर रोजी दुपारी अनेकांना वाघाचे दर्शन झाले. पर्यटक व वाहनांवर फिरणाऱ्यांनी आनंदाचा अविस्मरणीय क्षण अनुभवला. मात्र, शेतात रात्री मुक्काम करमाऱ्या व रात्री-अपरात्री फिरणाऱ्या ग्रामस्थांमध्ये मात्र दहशत पसरली आहे. मागीलवर्षी हरीसाल गावशिवारात या वाघाने धुमाकूळ घातला होता. यावेळी मात्र हा वाघ शांतपणे फिरत होता. अनेक प्रवाशांनी उघड्या डोळ्यांनी या वाघाचे दर्शन



घेतले व त्याला अगदी जवळून कॅमेऱ्यात कैद देखिल केले. तर काहींनी या वाघोबाचे चक्क व्हीडिओ देखिल काढले. एका माहितीनुसार, मध्य प्रदेशातून सातपुडा मेळघाट कॉरिडोरच्या जंगलातून चौराकुंड वनपरिक्षेत्रात प्रवेश करून हरीसाल रेंजमध्ये दोन वर्षांपूर्वी आलेली वाघीण असल्याची खात्री आहे. गुगामल वन्यजीव विभागातील हरीसलचे रेंजर गिरीश जतकर आणि सिपना वन्यजीव विभागातील चौरकुंडचे वन परिक्षेत्र धिकारी खेरडेयांनी वाघिणीच्या मुक्त संचाराच्या घटनेला दुजोरा दिला आहे. हरीसाल ते खोमरा, चौपन, वनमालुर, चौराकुंड तथा तांगडा मार्गाद्वारे ये-जाकरणाऱ्यांना धोको पोहोचण्याची शक्यता नाकारता येत नाही. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, हरीसाल रेंजच्या चिचापाटी नावाच्या जंगलातील थाडादा रस्त्यावर मेळघाटची पाहुणी वाघीण अनेकदा दिसली आहे.

# 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण' महारांगोळी

## अधिवेशनानंतर आठवडाभर सर्वांसाठी खुली

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२१नागपूर,–** सिव्हील लाईन्स परिसरातील मुख्यमंत्री सचिवालयात साकारलेली 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजने'वर आधारीत महारांगोळी विधीमंडळ अधिवेशनानंतरही सर्व सामान्यांना पाहण्यासाठी खुली ठेवण्यात येणार असल्याची माहिती सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपविभागीय अभियंता संजय उपाध्ये यांनी दिली आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाच्यावतीने मुख्यमंत्री



सचिवालय परिसरात विधीमंडळ हिवाळी अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर राज्य शासनाच्या विविध विभागांची शिबिर कार्यालये उभारण्यात आली आहेत. राज्य शासनाच्या महत्वाकांक्षी मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेवर महारांगोळी याच परिसरात मुख्यमंत्री कार्यालयाच्या मागील भागात साकारण्यात आली आहे. १२ सेमी उंचीच्या डायसवर २८८ फुट आकाराची (१२ द२४ फुट) ही सुबक रांगोळी सर्वांचे लक्ष वेधून घेत आहे. येथे लाडक्या बहिणीची प्रातिनिधिक प्रतिकृती आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या प्रतिकृती रेखाटण्यात आल्या असून खास शैलीतील 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' ही खास शब्द रचनाही रेखाटण्यात आली आहे.

प्रसिद्ध रांगोळी कलावंत सुनिल तरारे यांच्या नेतृत्वात नागपूर व यवतमाळ येथील एकूण पाच कलाकारांनी ६० किलो रांगोळीद्वारे ही महारांगोळी साकारली आहे.

# मॉर्निंग चषक -२०२४ टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेचे थाटात उद्घाटन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२१अमरावती** शिक्षण महर्षी डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या १२६ व्या जयंती उत्सवानिमित्त श्री शिवाजी शिक्षण संस्था कर्मचारी व मॉर्निंग क्रिकेट क्लब अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने स्व. श्री उपाख्य दादासाहेब काळमेघ व स्व. श्री प्रशांत उर्फ गोटूभाऊ चांदुरकर, स्व. चैतन्य संतोष रामेकर, स्व.रामभाऊ विठोबाजी ठाकरे, स्व.बेबीताई देविदास भोंड, स्व. मधुकरराव सगणे यांच्या स्मृती प्रित्यर्थ अमरावती शहरातील रुलर इन्स्टिटयूट क्रीडांगण पंचवटी चौक अमरावती दिनांक २० डिसेंबर २०२४ ते २५ डिसेंबर २०२४ दरम्यान लीग पद्धतीने या स्पर्धेचे मा.श्री हर्षवर्धन देशमुख अध्यक्ष श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती तथा उपस्थित मान्यवर यांच्या हस्ते दीप प्रज्वलन तथा श्री संत गाडगे महाराज व डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या प्रतिमेला हाराअर्पण करून उद्घाटन या कार्यक्रमास सुरुवात झाली. या स्पर्धेत प्रथम पारितोषिक ७१ हजार, द्वितीय पारितोषिक ५१ हजार, तृतीय पारितोषिक ३१ हजार व इतर



प्रोत्साहनपर बक्षिसे समाविष्ट आहेत. स्पर्धेचे उद्घाटन दिनांक २० डिसेंबर २०२४ रोजी उद्घाटन संपन्न झाले. यावेळी मंचावर मा.श्री हर्षवर्धन देशमुख कार्यक्रमाध्यक्ष, मा.श्री.गजानन पुंडकर उद्घाटक, मा. श्री. हेमंत काळमेघ मार्गदर्शक, सदाशिवराव चिंचे, सौ.स्मितातार्ई देशमुख, सौ.पुनम मोहोड, श्री. अभय ढोबळे, श्री.गजानन गोसावी, श्री. विलास ठाकरे, श्री. संदीप देशमुख आदी मंचावर उपस्थित होते.

## २० ते २५ डिसेंबर या काळात मॉर्निंग चषक-२०२४ चे आयोजन

## जिल्ह्यातील क्रिकेट रसिकांसाठी ठरणार मेजवाणी

दरवर्षीप्रमाणे यंदाही मॉर्निंग चषक टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धा ज्याची विदर्भ तसेच महाराष्ट्रभर चषकाची ख्याती आहे. या स्पर्धेची प्रतीक्षा महाराष्ट्रातील अनेक खेळाडू पाहत असतात अशा उत्कृष्ट टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेचे आयोजन निरंतर अखंड सुरू ठेवावे अशी अपेक्षा, श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावतीचे अध्यक्ष श्री हर्षवर्धन देशमुख यांनी यावेळी व्यक्त केली.

भाऊसाहेबांच्या विचारांना सार्थक ठरणारे, भाऊसाहेबांनी शिवाजी शिक्षण संस्था पूर्वी शिवाजी व्यायाम मंडळाची स्थापना केली होती आपल्या या मैदानांवरून एखादा मिल्खा सिंग, ध्यानचंद तयार व्हावा अशी त्यांची इच्छा होती त्यांच्या स्वप्नांना पूर्ण करण्यासाठी मॉर्निंग क्रिकेट क्लबचे आयोजन सार्थक ठरत आहे. मॉर्निंग क्लबने या स्पर्धेत सातत्य ठेवत अखंड अशा स्पर्धांचे आयोजन करावे, असे प्रतिपादन श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावतीचे सदस्य श्री. हेमंत काळमेघ यांनी व्यक्त केले.

यावेळी कार्यक्रमाला वेलकम ग्रुप जेष्ठ मंडळ अमरावती व मॉर्निंग क्रिकेट क्लबचे सर्व सदस्य यावेळी उपस्थित होते. या मॉर्निंग चषक २०२४ टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धा कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मिलिंद पुंड यांनी केले.–

# शिकार प्रकरणी कोठडीत अत्याचार नाही – मेळघाट प्रादेशिक वनविभाग

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२१अमरावती–** परतवाडा वन परिक्षेत्रातील वाघाच्या शिकार प्रकरणी आदिवासी संशयितावर कोठडीत कोणतेही अत्याचार करण्यात आलेले नाही. वास्तविक पाहता नेमराव कासदेकर यांना अटक करण्यापूर्वीच आजार असल्याचे, तसेच ते वन कोठडीत असताना त्यांच्यावर कोणतेही अत्याचार झाले नाहीत, याबाबत उपवनसंरक्षक अग्रीम सैनी यांनी वस्तुस्थितीदर्शक खुलासा केला आहे.

मेळघाट प्रादेशिक वनविभागांतर्गत अंजनगाव परिक्षेत्रातील पांढराखडक वर्तुळ, वस्तापूर बिटमध्ये दि. २६ नोव्हेंबर २०२४ रोजी एक वाघ मृत अवस्थेत आढळून आला. याप्रकरणी चौकशीत ९ संशयितांना अटक केली. अचलपूर न्यायालयाने संशयित आरोपींची चौकशीसाठी वनकोठडी दिली. संशयित आरोपींच्या वनकोठडी दरम्यान सर्व संशयित आरोपींची २४ तासाच्या अंतराने अचलपूर येथील उप जिल्हा रुग्णालयात वैद्यकीय तपासणी करण्यात आली.

नियमित वैद्यकीय तपासणी दरम्यान नेमराव कासदेकर याच्या छातीवर कुठलीही जखम आढळून आली नाही. त्याचप्रमाणे कुठल्याही वैद्यकीय अहवालामध्ये जबरदस्तीने जखम घडवून आल्याचा उल्लेख नाही. वनकोठडी दरम्यान उपजिल्हा रुग्णालयात करण्यात आलेल्या नियमित वैद्यकीय तपासणीमध्ये नेमराव कासदेकर याच्या त्वचेला बुरशीजन्य संसर्ग असून गुप्तांगालाही संसर्ग असल्याचे वैद्यकीय अहवालात नमूद आहे. त्यानुसार उपचार करण्यात आले.

वनकोठडीची मुदत संपल्यानंतर न्यायालयीन कोठडीत देताना दि. १८ डिसेंबर २०२४ रोजी अमरावती मध्यवर्ती कारागृहात देण्यापूर्वी अमरावती जिल्हा सामान्य रुग्णालयातही वैद्यकीय तपासणी केली. या तपासणीमध्येही छातीवर जखम असल्याचे नमूद नाही. नेमराव कासदेकर याच्या त्वचेवर संसर्ग असल्याचे अमरावती जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या वैद्यकीय अहवालात नमूद आहे. संशयितास अमरावती तुरुंग अधिकारी यांच्या ताब्यात देत असताना संशयित आरोपीने शरीराला खाज येत असल्याचे, तसेच जागोजागी त्वचेचे सालपट निघत असल्याचे सांगितले. मध्यवर्ती तुरुगांतील कर्मचारी यांनीही संपूर्ण पाहणी करुनच संशयितास ताब्यात घेतले.

नेमराव कासदेकर याची न्यायालयीन कोठडीत असताना प्रकृती बिघडली आहे. याबाबत त्याच्या नातेवाईकांना तुरुंग प्रशासनाकडून कळविण्यात आले आहे. मात्र दि. २० डिसेंबर २०२४ रोजी मारहाण करून छातीवर जखमा केल्याचे आणि गुप्तांगावर चटके दिल्याचे वृत्त पूर्णपणे निराधार आहे, मेळघाट प्रादेशिक वनविभाग उपवनसंरक्षक अग्रिम सैनी यांनी कळविले आहे.

# वाहनाच्या धडकेत पुन्हा एका बिबट्याचा बळी

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.२१अमरावती :** राष्ट्रीय महामार्गाच्या रहाटगाव ते बडनेरा या नवीन बायपास मार्गावर अज्ञात वाहनाच्या धडकेत एका बिबट्याचा मृत्यू झाल्याची घटना शुक्रवारी सकाळी उघडकीस आली. वाहनाच्या धडकेत बिबट्याचा बळी जाण्याची ही गेल्या पंधरा दिवसांतील ही दुसरी घटना आहे. शहराला लागून जाणाऱ्या रहाटगाव-बडनेरा नव्या बायपासवर वडाळी ते महादेव खोरी दरम्यान गुणवंत बाबा मंदिरानजीक रस्त्याच्या कडेला बिबट्याचा मृतदेह शुक्रवारी सकाळी नागरिकांना आढळून आला. या घटनेची माहिती वनविभागाला मिळताच वनविभागाचे पथक घटनास्थळी पोहचले. या बिबट्याचे वय अंदाजे २ वर्षे असल्याचे सांगण्यात



आले. या घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी गर्दी केली होती. नवीन बायपास मार्गाच्या लगत वडाळीचे जंगल आहे.या परिसरात बिबट्याचे वास्तव्य आहे. यापुर्वी या भागात बिबट्यांची पिल्ले आढळून आली होती. रात्री अज्ञात वाहनाच्या धडकेत या बिबट्याचा मृत्यू झाला असावा, अशी माहिती मानद वन्यजीव रक्षक डॉ. जयंत वडतकर यांनी दिली.

गेल्या ७ डिसेंबर रोजी पोहरा मालखेड राखीव जंगलाच्या चांदूर रेल्वे वनपरीक्षेत्राअंतर्गत चिरोडी गावाजवळ रस्ते अपघातात बिबट्याचा मृत्यू झाला होता. त्यामुळे जंगलालगतच्या रस्त्यावरील वन्यप्राण्यांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

# देशातील अंगणवाडी सेविकांना आर्थिक सुरक्षा अदा करा : बळवंत वानखडे

## लोकसभेत अतारांकित प्रश्नाद्वारे मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अमरावती**

शासनाच्या विविध योजना तळागाळातील सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवणाऱ्या अंगणवाडी सेविका, तसेच मदतनीस यांना त्यांच्या कार्याच्या हिशेबाने आर्थिक सुरक्षा अदा करण्याची मागणी खासदार बळवंत वानखडे यांनी संसदेच्या हिवाळी सत्रात केंद्रीय महिला आणि बालविकासमंत्री यांच्याकडे अतारांकित प्रश्नाच्या माध्यमातून केली.



या अतारांकित प्रश्नाच्या माध्यमातून देशभरातील अंगणवाडी केंद्रांमध्ये नोंदणीकृत सहा वर्षांखालील मुले, गरोदर महिला आणि स्तनपान करणाऱ्या महिलांची राज्यनिहाय

संख्या किती? महाराष्ट्रासह काही राज्य सरकारांनी केंद्र सरकारशी जोडलेले नसलेले अंगणवाडी केंद्र निर्माण केले आहे का? अंगणवाडीतील बाधित व्यक्तींना अतिरिक्त शुल्क आणि अतिरिक्त निधीचीही शक्यता वाढ करण्याची करण्यात येणार आहे का? याबाबतची विचारणा खासदार वानखडे यांनी केली.

केंद्र सरकारने अंगणवाडीच्या सेविकांच्या आर्थिक सुरक्षेच्या अनुषंगाने विमा योजना अथवा सामाजिक विकास योजना अशी कोणतीही तरतूद केली आहे का? तसे असल्यास या योजनेअंतर्गत आंगणवाडीतील बाधित व्यक्तींना देण्यात येणारी आर्थिक भरपाईची रक्कम. तपशील काय आहेत? मागील तीन वर्षांत उक्त यं.जनेतून लाभ घेतलेल्या अंगणवाडी सेविकांची राज्यनिहाय संख्या किती आहे? असे विविध उपप्रश्न खासदार बळवंत वानखडे यांनी उपस्थित केले. अंगणवाडी सेविका यांच्याविषयी धोरणे आणि योजना तयार करण्यासाठी केंद्र सरकार जबाबदार आहे आणि दैनंदिन कामासाठी राज्य सरकारे जबाबदार असल्याचे खा. वानखडे म्हणाले.

**अंगणवाडी सेविका, मदतनिसांना असे मिळते अनुदान**

भारत सरकारची मुख्य अंगणवाडी केंद्र अंगणवाडी सेविकांना प्रत्येकी ४,५०० रुपये आणि लहान अंगणवाडी सेविकांना ३५०० रुपये अंगणवाडी मदतनीस यांना दरमहा २२५० प्रतिमहिना केंद्र शासनामार्फत दिला जातो. अंगणवाडी सेविकांच्या विमाबाबत पंतप्रधान जीवन विमा योजनेअंतर्गत १८ ते ५० वर्षे वयोगटातील अंगणवाडी सेविकांना दोन लाख (कोणत्याही कारणास्तव मृत्यूचा समावेश आहे.) दिला जातो. तसेच कायमचे एकूण अपंगत्व आल्यास १ लाख दिला जातो, या आशयाचे – उत्तर लेखी स्वरूपात दिले गेले.

# विद्यापीठाची कु. लिना अवथळे हिची प्रजासत्ताक दिनी दिल्लीत होणाऱ्या आर.डी. परेडसाठी राष्ट्रीय संघात निवड

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अमरावती**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ संलग्नित अकोला येथील श्री. रा.ल.तो विज्ञान महाविद्यालयाची राष्ट्रीय सेवा योजना विभागाची विद्यार्थीनी कु. लिना विठ्ठल अवथळे हिची कवयित्री बहीणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव येथे नुकत्याच पार पडलेल्या राष्ट्रीय पश्चिम विभागीय निवड चाचणीमधून २६ जानेवारी, २०२५ रोजी दिल्ली येथे होणाऱ्या प्रजासत्ताक दिन परेड (आर.डी.परेड) करीता राष्ट्रीय संघात निवड करण्यात आली आहे. महाराष्ट्रातून दिल्ली येथे होणाऱ्या प्रजासत्ताक दिन आर.डी. परेड करीता राष्ट्रीय सेवा योजनेचे १२ विद्यार्थी (०६ मुले व ०६ मुली) सहभागी होणार आहेत. यामध्ये कु. लिना अवथळे हिने संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे नाव उंचावत राष्ट्रीय संघात स्थान पटकाविले. या यशाबद्दल कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी ही बाब विद्यापीठाकरिता अभिमानाची व गौरवास्पद असून राष्ट्रीय पातळीवर विद्यापीठाचे नाव उंचावणारी आहे असे मत व्यक्त करुन कु. लिनाचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले व तिला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. तसेच विद्यापीठाचे प्र-कुलगुरु डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. निलेश कडू यांनीही कु. लिनाचे अभिनंदन करुन पुढील वाटचालीकरीता शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी श्री. रा.ल.तो विज्ञान महाविद्यालय, अकोलाचे रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी डॉ. शैलेश जयस्वाल उपस्थित होते.

राष्ट्रीय सेवा योजनेमार्फत सुरुवातीला कु. लिना विठ्ठल अवथळे हिची अकोला जिल्हास्तरीय निवड चाचणीमधून विद्यापीठ संघात निवड झाली होती. त्यानंतर स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथे राज्यस्तरीय पूर्व निवड चाचणीत यशस्वी होऊन तिने महाराष्ट्र संघात स्थान पटकाविले. त्यानंतर कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव येथे राष्ट्रीय पश्चिम विभागीय निवड चाचणीमध्ये महाराष्ट्र संघातून तिची राष्ट्रीय संघाकरीता निवड करण्यात आली. यामध्ये महाराष्ट्र, गोवा, गुजरात, कर्नाटक, आंध्र प्रदेश, तेलंगणा, दिव दमन या राज्यांमधील विद्यार्थी, विद्यार्थीनी सुध्दा सहभागी झाले होते.

# आठ ग्रामपंचायतींमध्ये सरपंच, उपसरपंच पदाकरिता २४ ला निवडणूक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अमरावती**

सहा तालुक्यांतील आठ ग्रामपंचायतींमध्ये राजीनामा व अन्य काही कारणांमुळे रिक्त झालेल्या सरपंच, उपसरपंच पदाकरीता २४ डिसेंबरला निवडणुक होऊ घातली आहे. या निवडणुकीकरीता प्रशासन सज्ज झाले असून गावस्तरावर सरपंच, उपसरपंच पदाकरीता रस्सीखेच सुरू झाली आहे. जिल्ह्यात चार सरपंच, चार उपसरपंच पदाकरीता निवडणुक होणार आहे. नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील वेणी गणेशपुर येथे सरपंच पदाकरीता निवडणुक होत आहे. येथील सरपंच पद हे नामाप्र महीलेकरीता राखीव



आहे. याशिवास चांदूरबाजार तालुक्यातील शिरजगाव कसबा ग्रामपंचायतीमध्ये उपसरपंच, अंजनगाव सुर्जी तालुक्यातील दहीगाव खुर्द ग्रामपंचायतीमध्ये उपसरपंच, बरूड खुर्द सरपंच, चांदूर रेल्वे तालुक्यातील चिरोडी सरपंच, मालखेड सरपंच, अमरावती तालुक्यातील कामुंजा उपसरपंच व दर्यापुर तालुक्यातील भामोद उपसरपंच अशा चार सरपंच, व चार उपसरपंच पदाकरीता येत्या २४ डिसेंबर रोजी निवडणुक होत आहे. सरपंच पदाकरीता तहसिलदारांनी प्राधिकृत केलेले निवडणुक निर्णय अधिकारी निवडणुक घेतील तर निवडणुक ही सरपंच यांच्या अध्यक्षतेखाली उपसरपंचपदाची होणार आहे. या निवडणुकीमुळे या गावांमध्ये राजकीय वातावरण तापले आहे.

# फेब्रुवारीमध्ये अमरावतीच्या रस्त्यावर धावणार इलेक्ट्रिकल शिवाई बसेस

## आरामदायी एसीतील प्रवासाला पसंती राहणार : १४ तालुक्यात चार्जिंग स्टेशनचे काम युध्दस्तरावर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अमरावती**

पर्यावरणपुरक बॅटरीवर चालणाऱ्या बसेस आता अमरावती जिल्ह्यातील एसटी महामंडळाच्या ताफ्यात लवकरच सहभागी होणार आहे. शिवाई असे या बसेसचे नाव असून, अमरावती जिल्ह्यात जानेवारी अखेरपर्यंत २५ शिवाई बसेस रस्त्यावर धावणार आहेत. याकरिता जिल्ह्यातील १४ तालुक्यातील चार्जिंग स्टेशनवर १७ सेटअपची सुविधा निर्माण होण्याचे काम युध्दस्तरावर सुरु आहे.



साधारण बसचे भाडे जर १०० रुपये असेल, तर शिवशाहीचे भाडे १६० रुपयांपर्यंत असेल. त्यामुळे शिवशाही बसच्या भाड्याप्रमाणेच शिवाई बसेसचे भाडे राहणार आहे. साधारण बसच्या भाड्याच्या तुलनेत शिवाईचे भाडे हे ६० टक्के अधिक राहणार आहे. शिवाई ही पूर्णपणे वातानुकूलीत बस राहणार आहे. अमरावती जिल्ह्यातील १४ तालुक्यात १४ चार्जिंग स्टेशनचे काम सुरु आहे. या चार्जिंग स्टेशनवर १७ चार्जिंगचे स्टेटअप राहणार आहे.

**तपोवन येथील विभागीय कार्यशाळेत स्टेटअपचे काम**

अमरावती जिल्ह्यात पहिल्या टप्यात २५ शिवाई बस येणार आहे. याकरिता इन्फ्रास्ट्रक्चर तयारीचे काम युध्दपातळीवर काम सुरु आहे. शिवाई बसच्या स्टेटअपमध्ये रॅम्प, वाशिंग व अन्य सुविधांचे सेटअप तयार करण्याचे काम हे तपोवन येथील विभागीय कार्यशाळेत सुरु आहेत. येथील सेटअपचे काम जानेवारीअखेरपर्यंत पुर्ण होण्याचे संकेत आहे.

**२७१ बसेसची मागणी**

अमरावती जिल्ह्यात एसटी महामंडळाच्या शिवाई बसेस खासगी वाहतुकदारांकडून चालविल्या जाणार आहे. यासंबंधाने कंत्राटपध्दतीतून हे काम चालणार आहे. त्यामुळे शिवाईच्या देखभालची जबाबदारी संबंधित वाहतुकदारांकडे राहणार आहे. पहिल्या लॉटमध्ये २५ शिवाई बसेस मिळणार आहे. २०१९ च्या तुलनेत जिल्ह्यातील १५५ बसेस कमी झालेल्या आहेत. त्यामुळे भविष्यात साधारण व शिवाई अशा एकुण २७१ बसेसची मागणी करण्यात आली आहे.

### साधी इलेक्ट्रॉनिक्स बस पण संपूर्ण वातानुकुलित

अमरावती जिल्ह्यातील १४ तालुक्यासाठी पहिल्या टप्प्यात ईव्हीच्या २५ शिवाई एसी बसेस मिळणार आहेत. या बसकरिता चार्जिंग सेटअपचे काम युध्दस्तरावर सुरु आहे. जानेवारी शेवटपर्यंत चार्जिंग स्टेशनचे काम पुर्ण होईल. १४ तालुक्यात १७ स्टेटअप चार्जिंग युनिट तयार करण्याचे काम सुरु आहे. याठिकाणी बेसीक प्लॅटफार्म तयार होत आहे. या बसेस खासगी वाहतुकदारांकडून चालविल्या जाईल. देखभालची जबाबदारीदेखील वाहतुकदारांवरच राहणार आहे. या बसचे भाडे शिवशाही इतकेच राहणार आहे.

**– निलेश बेलसरे, विभागीय नियंत्रक, अमरावती एसटी विभाग,**

# डॉ. श्यामसुंदर निकम लिखित क्रोधाग्नी कादंबरीचे उद्या प्रकाशन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१ अमरावती**

सुप्रसिद्ध साहित्यिक तथा जिल्हा अमरावतीचे माजी शल्यचिकीत्सक डॉ. श्यामसुंदर निकम यांच्या क्रोधाग्नी या कादंबरीचे प्रकाशन रविवारी (ता. २२) सायंकाळी पाच वाजता स्थानिक अभियंता भवन येथे साहित्यिक व सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत होत आहे. डॉ. श्यामसुंदर निकम हे अमरावती येथील साहित्यिक असून माजी जिल्हा शल्यचिकित्सक म्हणून परिचित आहेत. यापूर्वी त्यांचे दोन कवितासंग्रह तसेच कोरोना या विषयावर आधारित एका कादंबरीसह दोन कादंबऱ्या, दोन माहितीपर पुस्तके, एक जीवन चरित्र नसेच एक ललितलेख संग्रहसुद्धा पसिद्ध आहे. क्रोधाग्नी ही त्यांची तिसरी कादंबरी असून ती एका तिहासिक विषयावर आधारित आहे.



या कादंबरीचे विमोचन जेष्ठ साहित्यिक वसंत आबाजी डहाके यांचे हस्ते होईल. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जेष्ठ साहित्यिका प्रभाताई गणोरकर असतील. प्रमुख अतिथी म्हणून दैनिक हिंदुस्थानचे प्रबंध संपादक विलास मराठे, दैनिक अमरावती मंडलचे संपादक अनिल अग्रवाल तसेच जेष्ठ समाजसेवक गोविंद कासट प्रामुख्याने उपस्थित असतील. अमरावती येथील जेष्ठ साहित्यिका व समीक्षक प्रा. डॉ. शोभाताई रोकडे व जेष्ठ विचारवंत प्राचार्य डॉ. उद्धव जाने हे या कादंबरीवर भाष्य करणार आहेत. या प्रकाशन सोहळ्याला साहित्य क्षेत्रातील मंडळींना उपस्थित राहण्याचे आवाहन या सोहळ्याचे निमंत्रक जोत्सना निकम, डॉ. अमित निकम, डॉ. प्रितीशा निकम, इंजि. रोहित निकम, इंजि. समृद्धी निकम तसेच सृजन साहित्य संघ अमरावती यांनी केले आहे.

# मोहब्बतच्या दुकानात हिंसेचा माल : खा. बोंडे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१ अमरावती**

दररोज कुठल्या टपोरीसारखे जीन्स व टी-शर्ट सह तीन लाख रुपयांचे जोडे घालून संसदेत पोहोचणाऱ्या खासदार राहुल गांधी यांनी संसद परिसरात ज्याप्रमाणे व्यवहार केला आहे, त्यावरून त्या प्रकाराला स्पष्टपणे गुंडागर्दी म्हटले जाऊ शकते. म्हणजेच मोहोब्बतच्या दुकानात राहुल गांधी यांच्यातर्फे हिंसेचा माल विकला जात आहे, अशी प्रतिक्रिया देत भाजपचे खासदार डॉ. अनिल बोंडे यांनी संसदेत भाजपा खासदारासोबत खा. राहुल गांधी यांनी केलेल्या धक्काबुक्कीचा निषेध केला. संसद परिसरात गांधी प्रतिमेसमोर काँग्रेसच्या विरोधात काँग्रेस खासदारांनी केलेल्या प्रकाराविरोधात निषेध प्रदर्शन आंदोलनात सहभागी खासदार डॉ. अनिल बोंडे यांनी म्हटले की, खासदार राहुल गांधी यांनी ज्या पद्धतीने नागालँडच्या आदिवासी महिला खासदारांसोबत गैरवर्तणूक केली. ओडिशाच्या ७८ वर्षीय खासदार प्रताप सारंगी यांच्यासह खासदार मुकेश राजपूत यांच्यासोबत धक्काबुक्की करून त्यांना खाली पाडले. यावरून खासदार राहुल गांधी सरळ सरळ संसदीय परंपरेचा अपमान करीत आहे, तो कदापि सहन केला जाऊ शकत नाही. काँग्रेसने राहुल गांधी यांच्या कृतीसाठी माफी मागितली पाहिजे. सोबतच खासदार राहुल गांधी राहुल गांधी यांच्याविरुद्ध कठोर कारवाई केली पाहिजे, अशी मागणी करत भाजप खासदारांनी यावेळी राहुल गांधी यांच्या विरोधात तीव्र घोषणाबाजी केली.



# चांदूर रेल्वेतील श्री विठोबा संस्थानच्या विश्वस्तपदी लक्ष्मण राठोड यांची नियुक्ती

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१चांदूर रेल्वे**

संपूर्ण महाराष्ट्रासह इतर राज्यात कापूराची यात्रा म्हणून प्रसिध्द असलेले अमरावती जिल्ह्यातील चांदूर रेल्वे तालुक्यातील श्रीक्षेत्र सावंगा विठोबा येथील श्री विठोबा संस्थान उर्फ श्रीकृष्ण अवधुत बुवा संस्थानच्या विश्वस्त पदी लक्ष्मण राठोड यांची बिनविरोध नियुक्ती करण्यात आली. श्री विठोबा संस्थानची सामान्य सभा शुक्रवारी दुपारी संस्थानचे अध्यक्ष पुंजाराम नेमाडे यांचे अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.

यावेळी संस्थानचे ज्येष्ठ विश्वस्त दिगांबर राठोड यांच्या राजीनाम्यामुळे विश्वस्तपद रिक्त झाले होते. त्या पदावर संस्थानचे विश्वस्त म्हणून अवधूती सांप्रदायातील ख्यातनाम व युवा व्यक्तिमत्व लक्ष्मण राठोड यांची संस्थानचे सर्व पदाधिकारी व विश्वस्त यांच्या सहमतीने नियुक्ती करण्यात आली. यावेळी संस्थानचे अध्यक्ष पुंजाराम नेमाडे, उपाध्यक्ष कृपासागर राऊत, सचिव अशोक सोनवाल विश्वस्त विनायक पाटील, वामन रामटेके, गोविद राठोड, अनिल बेलसरे, फुलसिंग राठोड, चरणदास कांडलकर, वैभव मानकर, स्वप्निल चौधरी उपस्थित होते.

# दिक्षाभूमीवर आल्याने प्रेरणा व नवी उर्जा मिळते -उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

## उपमुख्यमंत्र्यांची दिक्षाभूमीला भेट व महामानवाला अभिवादन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. २१ नागपुर**

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मृतींना वंदन करुन प्रेरणा व नवी उर्जा मिळते. दिक्षाभूमीला आल्यानंतर नेहमीच वेगळी अनुभूती व समाधानही मिळते, अशा भावना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज येथे व्यक्त केल्या.

उपमुख्यमंत्री श्री.शिंदे यांचे दिक्षाभूमी स्मारक समितीच्या वतीने स्वागत



करण्यात आले. यानंतर श्री.शिंदे यांनी बुद्ध प्रतिमा व बाबासाहेबांच्या अस्थिचे दर्शन घेवून अभिवादन केले. मंत्री सर्वश्री दादा भुसे, शंभुराज देसाई, उदय सामंत, प्रताप सरनाईक, योगेश कदम, माजी खासदार जोगेंद्र कवाडे, स्मारक समितीचे राजेंद्र गवई आदी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री श्री.शिंदे म्हणाले, दिक्षाभूमी ही तप आणि आदर्शाची भूमी आहे. बाबासाहेबांच्या विचारांनी प्रेरित होवून देश-विदेशातील अनुयायी येथे येतात व प्रेरणा घेतात. बाबासाहेबांचा आदर्श डोळयासमोर ठेवूनच देशाचा व राज्याचा कारभार चालत आहे. बाबासाहेबांचे विचार सर्वसामान्यांना न्याय देणार व जनसेवेला बळ देणारे आहेत. राज्यशासनाच्या वतीने तालुकानिहाय संविधानभवन बांधण्यात येत आहेत. तसेच चैत्यभूमीवर जागतिक दर्जाचे स्मारक बांधण्यात येत असल्याचेही त्यांनी सांगितले.

# विद्यापीठाच्या हिवाळी-२०२४ च्या काही परीक्षांच्या वेळापत्रकात बदल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. २१ अमरावती**

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या हिवाळी-२०२४ लेखी परीक्षेची वेळापत्रके विद्यापीठाच्या www.sgbau.ac.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहेत. सदर वेळापत्रकातील काही परीक्षांच्या वेळापत्रकात दुरुस्ती/सुधारित/नवीन वेळापत्रक जाहीर करण्यात येत आहे.

ज्या परीक्षांच्या वेळापत्रकांमध्ये बदल करण्यात आलेले आहेत, त्यामध्ये बी.सी.ए. सेमि.-५ (सी.बी.सी.एस.), बी.फार्म सेमि.-१ (सी.बी.सी.एस.), बी.टेक.सेमि.-३ (एन.ई.पी.) (केमिकल टेक्नॉलॉजी अॅन्ड एफ.पी.ओ.पी.सी.), बी.एड्. सेमि.-३ (नवीन), डिप्लोमा इन सायबर सेक्युरिटी एस.-१ अॅन्ड २ (सी.बी.सी.एस.), डिप्लोमा इन. अप्लाईड कॉम्प्युटर टेक्नॉलॉजी एस.-१ अॅन्ड २ (सी.बी.सी.एस.), बी.ए. सेमि.-१ (एन.ई.पी.), बी.एस्सी. सेमि.-१ (एन.ई.पी.), बी.ई. (सर्व शाखा)/ बी.टेक. (केमिकल टेक्नॉलॉजी/एफ.पी.ओ.पी.सी./ बी.टेक्स्ट. सेमि.-१ अॅन्ड २ एन.ई.पी., एम.एस्सी. (पर्यावरण विज्ञान) सेमि.-१ (एन.ई.पी.) सुधारित अभ्यासक्रम आणि बी.ई.सेमि.- ५ व ६ आणि ७ (सी.बी.सी.एस.) इलेक्टीव्हज पेपर्स या परीक्षांच्या वेळापत्रकांत बदल करण्यात आलेले आहेत. यासंदर्भात सर्वसंबंधित महाविद्यालये, प्राचार्य, केंद्राधिकारी, परीक्षा केंद्रांना परीक्षा विभागाकडून कळविण्यात आले असून महाविद्यालयांनी तातडीने आपल्या विद्यार्थ्यांना कळवायचे आहे. तरी विद्यार्थ्यांनी याची नोंद घ्यावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितीन कोळी यांनी केले आहे. अधिक माहितीकरीता त्यांचेशी ९८५००४२३५७ या क्रमांकावर संपर्क साधता येईल, असे विद्यापीठाच्यावतीने कळविण्यात येत आहे.

# अन्नसुरक्षा योजनेचा फज्जा : नागरिक करतात व्यापाऱ्यांना विक्री
## रेशनच्या तांदूळ, गव्हाची खुल्या बाजारात खुलेआम विक्री

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अमरावती**

राज्यात कोणीही उपाशी राहू नये, त्यांना कमी पैशात अन्नधान्य उपलब्ध व्हावे. त्यांचा आर्थिक स्तर उंच व्हावा म्हणून शासनाने गरिबातल्या गरीब नागरिकांसाठी राष्ट्रीय अन्नसुरक्षा ही योजना सुरू केली. कोरोना काळात राज्यातील गोरगरीब जनतेला त्याचा फटका बसू नये, यासाठी अन्नसुरक्षा योजनेतील लाभार्थ्यांना मोफत तांदूळ देण्याचा निर्णय तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी घेतला. तेव्हापासून नागरिकांना मोफत धान्य वितरित केल्या जात आहे. शासनाच्या उद्देश जरी चांगला असला तरी नागरिकांनी या मोफत रेशनाकडे पाठ फिरवली असून रेशन दुकानातून वितरित होणारे धान्य अनेक कुटुंब खुल्या बाजारात विक्री करीत असल्याचे चित्र ग्रामीण भागात आहे.



विशेषता दुष्काळ आणि भूकबळी या परिस्थितीत मोफत धान्य शासनाने पुरविणे आवश्यक आहे. मात्र सद्यस्थितीत अशी कोणती परिस्थिती नसताना केवळ राजकीय स्वार्थासाठी शासन अशा योजना राबवत असल्याने त्यांच्यातील क्रयशक्ती घटत असून शेतीवरही काम करण्यासाठी मजूरही मिळणे दुरापस्त होत आहे. केंद्र शासनाने २०१३ मध्ये राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायदा संमत केला होता. या कायद्यांतर्गत प्राधान्य गटाच्या लाभार्थ्यांना अन्नधान्य वाटप करण्यात येते. मात्र ही योजना चांगली असली तरी या योजनेत गडगंज श्रीमंतांचाच भरणा अधिक असल्याने वगरज नसतानाही या योजनेत नावे समाविष्ट करून घेतल्याने खरे लाभार्थी वंचित असून श्रीमंतच लाभार्थी अधिक आहेत. त्यामुळे अधिकाधिक लाभार्थ्यांनी रेशनचे अन्नधान्य न खाता बाहेर खुल्या बाजारपेठेत विकत आहेत

**व्यापाऱ्यांची हजेरी**

व्यापायांनाही दर महिन्यांच्या रेशन वितरणाच्या तारखा माहीत असून बरोबर त्याच दिवशी अनेक व्यापारी गाव पिंजून काढतात. व लाभार्थ्यां कडील गहू, तांदूळ खरेदी करतात. मूल तालुक्यात गव्हाचे उत्पादन नगण्य आहे. तरी व्यापारी घरोघरी फिरून गहू घेताना दिसतात. हा गहू कुठून येतो. असा प्रश्न उपस्थित केला जात असून शासनाने पुढाकार घेत चौकशी करून निर्बंध आणण्याची मागणी होत आहे.

**मोफत रेशनऐवजी रोजगाराची गरज**

शासनाने मोफत दिलेले अन्नधान्य किती दिवस खाणार? या मोफत अन्नधान्यातून क्रयशक्ती कमी होत असून शासनाने मोफत धान्य बंद करून रोजगाराच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात. परिणामी मोफत रेशनची गरज पडणार नाही, अशी मागणी युवक करीत आहेत. शासनाने अन्नधान्य दीर्घकाळापर्यंत मोफत वितरण करावे, अशी कुठलीही मागणी नसताना शासनाने केवळ राजकीय स्वार्थापोटी मोफत अन्नधान्य वितरित करीत असल्याचा आरोप सर्वसामान्यांनी केला आहे.

## निष्काम कर्मयोगी श्री संत गाडगेबाबांचा ६८ वा पुण्यतिथी महोत्सव
# विश्वस्त बापूसाहेब देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत
# शनिवारी रात्री १२.२० मिनिटांनी वाहली पुण्यस्मरण श्रद्धांजली

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अमरावती**

१९ व्या शतकात अज्ञान, अस्वच्छता अंधश्रद्धा यांनी बुरसटलेल्या समाजाच्या उद्धारासाठी आपला देह चंदनासारखा झिजवत अतुलनीय अकल्पनीय अविश्वसनीय कार्य करणारे कर्मयोगी श्री संत गाडगेबाबा यांच्या ६८ व्या पुण्यतिथी निमित्त संत गाडगेबाबा नगर अमरावती येथील श्री बाबांच्या पवित्र समाधीस्थळी त्यांच्या पावन स्मृतीस अभिवादन करण्यात आले. यावेळी श्री बाबांच्या समाधी स्थळाच्या परिसरात संस्थेचे विश्वस्त बापूसाहेब देशमुख यांच्या मार्गदर्शनात स्वच्छता अभियान राबविण्यात आले.प्रामुख्याने हजारो भाविक भक्तांच्या उपस्थितीत आज संत गाडगेबाबांना शनिवारी रात्री १२.२० मिनिटांनी पुण्यस्मरण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.



दरम्यान संस्थेचे प्रमुख विश्वस्त श्री बापूसाहेब देशमुख यांच्या मार्गदर्शनात सागर देशमुख व्यवस्थापक प्रकाश महात्मे यांच्या आयोजनातून, श्री बाबांच्या पुण्यतिथी सेवासप्ताह निमित्त गरजूंना अन्नदान-वस्त्रदान तसेच काकड आरती,श्री बाबांची सामुदायिक प्रार्थना, भजन-कीर्तन-हरिनाम आदी सर्व कार्यक्रमांच्या माध्यमातून कर्मयोगी गाडगेबाबांच्या विचारांचा जागर मोठ्या उत्साहात या ठिकाणी पार पडलाशुक्रवारी सकाळच्या सत्रात पहाटे काकड आरती, श्री बाबांची सामुदायिक प्रार्थना, स्वच्छता अभियान, त्यानंतर ह.भ.प. वाणीभूषण सोपान महाराज सरोदे यांच्या अमृततुल्य वाणीतून भागवत, तदनंतर गरजूंना अन्नदान स्व. सुरेंद्रजी भुंबर व स्व. विनोद भुंबर यांचे स्मरणार्थ श्री सौरभ भुंबर श्री गाडगेबाबा नगर अमरावती, संस्थेतर्फे गोरगरीब गरजूंना वस्त्रदानासह उबदार ब्लँकेट्स चे वितरण, राष्ट्रसंत महिला भजन मंडळ यांचे श्री बाबांच्या जीवनावर भजन, ह.भ.प. लक्ष्मीबाई गहुकार यांचे गाडगेबाबांच्या जीवनावर प्रवचन, सायंकाळच्या सत्रात हरिपाठ, श्री बाबांची सामुदायिक प्रार्थना बापूसाहेब देशमुख व सहकारी, त्यानंतर ऐश्वर्या दीदी खंडारे यांचे राष्ट्रीय कीर्तन, ह.भ.प. ऋषिकेश महाराज रेळे यांची खंजिरी एक्सप्रेस,ह.भ.प. भरतजी रेळे यांचे सप्तखंजेरीतून समाजप्रबोधन पर कार्यक्रम, रात्री ११:४५ ते १२:०० संत गाडगेबाबांच्या महानिर्वानाबद्दल माहिती विश्वस्त बापूसाहेब देशमुख, त्यानंतर रात्री १२:०० ते १२:१५ श्रद्धांजली गीत सादरकर्ते संत गाडगेबाबा श्रद्धांजली गीत संच, रात्री १२:२० मिनिटांनी सुनी खबर की संत गाडगेबाबा हमको छोड गये,धडक भरी छाती मे हमको पल भर तो नही होश रहे, राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या या भावपूर्ण श्रध्दांजली पर गीतातून श्री बाबांना पुण्यस्मरण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.विशेषतः श्री संत गाडगेबाबांचा ६८ वा पुण्यतिथि महोत्सव कार्यक्रम तसेच स्मृतीदिन व पुण्यस्मरण श्रद्धांजली सोहळा श्री गाडगेबाबा समाधीस्थळ अमरावती या अधिकृत फेसबुक पेज वरून लाईव्ह प्रसारित करण्यात आला.या भावपूर्ण कार्यक्रमाकरिता भाविक भक्तांनीसमाधी स्थळी उपस्थिती दर्शवली होती.

# अमरावती - मोर्शी रोडवरील निंभी टोलनाका सामान्य जनतेचा खिशावर कात्री
## शेतकरी भाजीपाला विक्रेत्यांनकरीता डोकेदुखी



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१ नेरपिंगळाई**

नुकताच सूरू झालेला निंभीमोर्शी रस्त्यावरील टोल ग्रामीण भागातील शेतकरी व भाजीपाला विक्रेत्यांनकरीता डोकेदुखी ठरत आहे.नेरपिंगळाई हे गाव ३०००० लोकसंखेचे जिल्ह्यातील सर्वातमोठे गाव असून नेरपिंगळाई व परिसरातील अनेक गावाचा उदरनिर्वाह शेतीवर अवलंबून असल्यानी शेतातील मालाला योग्य भाव मिळावा म्हणून येथील शेतकरी मोर्शी ,वरूड सह अनेक ठिकाणीं माल विकायला नेतात मात्र वरूड मोर्शी पोहचण्यापुर्वी निंभी वरील टोलनाका पास करावा लागतो त्यांच्या मालाला भाव योग्य मिळो की न मिळो टोल नाक्यावरील टोल भरून खिशाला कात्री मात्र लागायला सुरवात झाली आहे तर दुसरी कडे मोर्शी कींवां वरूड वरून अमरावती जाणाऱ्या वाहणाला नांदगाव पेठ आणि निंभी असे दोन टोल पास करावे लागत असल्याने त्यांच्या करीता तर टोल भरतांना खिश्याला डबल कात्री लागायची वेळ वाहनधारकांनवर आली आहे ऐकीकडे वाढती महागाई त्यात अनेक वर्ष्यांपासून शेती चे घटलेले उत्पन्न त्यात माल विकायला नेताना टोल वर बसणार भुर्दंड याने वाहनधारक व शेतकरी भाजीपाला विक्रेते हवालदिल झाले आहे तहसील कामाकरिता जर दिवसभरात ४-५ चकरा मारायचे काम पडले तर पेट्रोल डिझेल पेक्षा टोलचाच भुर्दंड मोठा बसू शकतो यामुळे मोर्शी तालुक्यातील शेतकरी व रहिवासी यांना या टोलमधून मुक्ती मिळायला पाहिजे अशी मागणी आता जोर धरू लागली तर काही गावातील नागरिक १०-१२ किलोमीटर प्रवास करतात त्यांनासुद्धा येथे टोल भरावा लागत आहे.

# साखळी उपसा सिंचनाला मंजुरी द्या; बंदिस्त पाईपलाईन द्वारे शेतीला सिंचनासाठी आधुनिक तंत्र वापरा
## आ. प्रतापदादा अडसड यांची विधानसभेत मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१धामणगाव रेल्वे**

नांदगाव खंडेश्वर परिसरातील शेतकऱ्यांना अधिक सिंचनाचा लाभ होऊ शकते त्यामुळे साखळी उपसा सिंचनाच्या प्रस्तावाला मान्यता द्या तसेच अनेक वर्षापासून शेतकऱ्यांना हिवाळ्यात ओलितासाठी अप्पर वर्धा प्रकल्पाचे पाणी देण्यात येते मात्र त्या पाण्याचा अपव्य होतो त्या ऐवजी आता बंदिस्त पाईपलाईन द्वारे शेतीला सिंचनासाठीआधुनिक तंत्र वापरा अशी मागणी आ प्रतापदादा अडसड यांनी विधानसभेत केली

विधानसभेच्या हिवाळी अधिवेशनाच्या अंतिम आठवड्याच्या प्रस्तावा दरम्यान बोलताना आमदार प्रतापदादा अडसड यांनी विधानसभेत धामणगाव मतदार संघाचे अनेक प्रश्न त्यांनी विधानसभेत मांडले केंद्र व राज्य शासनाने आरोग्याच्या अनेक सुविधा ग्रामीण भागात पुरवील्या आहेत आज आरोग्य केंद्राच्या इमारती उभ्या आहेत साहित्यही प्राप्त झाले आहे मात्र वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांची संख्या कमी असल्यामुळे आरोग्यसेवा पुरविण्यात यंत्रणेला त्रास होतो वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांची पदभरती त्वरित होणे गरजेचे आहे.शेतकऱ्यांच्या प्रश्न पोटतिडकेने विधानसभेत मांडताना त्यांनी विधानसभा निवडणुकीच्या दरम्यान शेतकऱ्यांना त्रास देणाऱ्या केंद्राचे माहिती मांडली एकीकडे सोयाबीन ची खरेदी सुरू असताना धामणगाव व चांदुर रेल्वे येथील हे केंद्र मुद्दामपणे बंद करण्यात आले या केंद्राची चौकशी करण्याची आग्रही मागणी त्यांनी प्रश्नोत्तराच्या तासात केली सीसीआयने सोयाबीन



कापसाच्या आधारभूत किमतीने शेतमालाची खरेदी सुरू केली नांदगाव खंडेश्वर मध्ये अद्यापही या केंद्राची सुरुवात झाली नाही हे केंद्र सुरू करावे सोयाबीनची १२ टक्के आद्रता ही १५ टक्के करण्यात आली त्याप्रमाणे आदेश देण्यात यावे. सोयाबीनला लस्टर लॉस करिता शिथिलता देण्यात यावी ही सुद्धा मागणी केली. सध्या रब्बी हंगामात ओलित करताना मोटर ची गरज असते भारनियमना नंतर विज आली की एकाच वेळी मोटर सुरू होते विजेचा दाब वाढल्याने डीपी व ट्रांसफार्मर जळतात त्यामुळे जिल्हा प्रशासनाकडे अधिक प्रमाणात डीपी व ट्रांसफार्मर ची उपलब्धता करून द्यावी सोलर ऊर्जा प्रकल्पाचे काम तातडीने करावे अशी मागणी आमदार प्रतापदादा अडसड यांनी विधानसभेत केली

**ग्रामपंचायत इमारत बांधकामासाठी नीधी द्या**

ग्रामीण भागाचा केंद्रबिंदू हे ग्रामपंचायत आहे या ग्रामपंचायतच्या इमारती ४० ते ५० वर्षात शिकस्त झाल्या आहे सदर ग्रामपंचायत इमारती बांधण्यासाठी निधी उपलब्ध करून द्या शासनाने विद्यार्थीनींना मोफत शिक्षणाची व्यवस्था केली मात्र खाजगी अभिमत विद्यापीठाच्या विद्यार्थीनींना मोफत शिक्षणाची सुविधा मिळत नाही त्या विद्यार्थीनींना सुविधा करून देण्याची मागणी ही आमदार प्रतापदादा अडसड यांनी विधानसभेत केली

# मुंबई काँग्रेस कार्यालयाची पक्ष पदाधिकाऱ्यांकडून पाहणी


**विदर्भ प्रजासत्ताक दि. २१ मुंबई**

मुंबई काँग्रेस कार्यालयावर भाजप जनता युवा मोर्चाच्या कार्यकर्त्यांनी भ्याड हल्ला करून कार्यालयाची तोडफोड केली व मोठे नुकसान केले. हल्लेखोरांनी सोनियाजी गांधी, राहुलजी गांधी यांच्यासह पक्ष नेत्यांच्या फोटोंवर शाई फेकली आणि काँग्रेस कार्यकर्त्यांशी झटापट केली. या हल्ल्यात काँग्रेस कार्यालयाच्या झालेल्या नुकसानीची पक्षाच्या वरिष्ठ




पदाधिकाऱ्यांनी पाहणी केली तसेच पक्ष पदाधिकारी व कार्यकर्ते यांची विचारपूस केली. राज्यसभा खासदार CWC सदस्य चंद्रकांत हंडोरे, प्रदेश काँग्रेसचे कोषाध्यक्ष डॉ. अमरजीत मनहास, प्रदेश काँग्रेसचे वरिष्ठ उपाध्यक्ष शिवजीसिंह, प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस राजन भोसले, महेंदर मुणगेकर, मुंबई काँग्रेसचे शशिकांत बनसोडे, एन. के. कांबळे यांनी मुंबई काँग्रेस कार्यालयाला भेट दिली.

# आज दिवस पावणे अकरा तासांचा, रात्र सव्वातेरा तासांची
## उत्तरायणास होणार आजपासून सुरुवात



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अमरावती**

दररोज उगवणारा सूर्य वर्षातील दोन्ही विषुवदिनी पूर्वेला निश्चित ठिकाणी उगवतो. नंतर ते स्थळ नेहमी किंचीत बदलत असते. काही दिवसांच्या फरकाने हा बदल आपल्या लक्षात येत असतो. येत्या शनिवार, दि. २१ डिसेंबरला सूर्य नेमका पृथ्वीच्या मकर वृत्तावर येईल व तेथून पुढे उत्तरेकडे सरकण्यास सुरुवात होईल. त्यामुळे या दिवशी आपल्या भागात सर्वांत लहान दिवस पावणेअकरा तासांचा व रात्र सव्वातेरा तासांची असणार आहे.

या दिवसापासून सूर्याच्या उत्तरायणास प्रारंभ होणार आहे. २१ डिसेंबर या सर्वांत लहान दिनालाच अयनदिन म्हणून ओळखतात. यावेळी सूर्य दक्षिण गोलार्धाकडे झुकलेलाअसल्याने त्या भागात उन्हाळा आणि आपल्या उत्तर गोलार्धात हिवाळा हा ऋतू असतो. तसेच दक्षिण ध्रुवावर दीर्घ कालावधीची रात्र आणि उत्तर ध्रुवावर दीर्घ कालावधीचा दिवस सुरू असतो. या दिवसापासून सूर्याचा प्रवास मकर वृत्तापासून कर्कवृत्तापर्यंत अर्थात उत्तरायण सुरू होऊन ते २१ जूनपर्यंत चालते. २१ डिसेंबर रोजी सूर्य हा पृथ्वीच्या दक्षिण गोलार्धात आपल्या शिखर बिंदूवर पोहोचतो.

### आज२१ डिसेंबरपासून वाढणार दिनमान

२१ डिसेंबर रोजी गडचिरोली येथील सूर्योदय सकाळी ६:५६ यावेळी, तर सूर्यास्त ५:४४ वाजता असेल. याच दिवसापासून स्वचि उत्तरायण सुरू होऊन दिनमान वाढत जाते, यातील फरक मात्र मकर संक्रांतीला जाणवर्ता, म्हणूनच मकर संक्रांतीपासून दिवस तीळा-तीळाप्रमाणे दिवस मोठा होतो.

# मोफत गणवेश योजनेची अंमलबजावणी आताशाळा स्तरावरच होणार
## पूर्वी प्रमाणे मिळणार लाभ शाळा व्यवस्थापन समितीलाच राहणार अधिकार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अमरावती**

थेट शासनस्तरावरून कापडाचा पुरवठा करून रेडिमेड कापड विद्यार्थ्यांना पुरविण्यासाठी 'एक राज्य, एक गणवेश' ही योजना चालू शैक्षणिक वर्षात अंमलात आणण्यात आली. मात्र, या योजनेच्या अंमलबजावणीत अनेक त्रुटी आढळून आल्याने विद्यार्थी, पालकांसह शिक्षकांना त्रास झाला. आता शासनाच्या वतीने ही योजना पूर्वीप्रमाणेच शाळास्तरावर अधिकार देऊन ती राबविण्यात येणार आहे.

याबाबत राज्याच्या शालेय शिक्षण विभागाने २० डिसेंबर २०२४ रोजी शासन निर्णय निर्गमित करून याबाबत स्पष्टता जाहीर केली. शाळा व्यवस्थापन समितीकडे विद्यार्थ्यांना गणवेश पुरवठा



करण्याचे संपूर्ण अधिकार प्रदान करण्यात आले आहे. यामुळे विहित वेळेत चांगल्या दर्जाचा गणवेश स्थानिक स्वराज्य संस्थांमधील विद्यार्थ्यांना मिळणार आहे, अशी माहिती विभाग व जिल्हास्तरावरील शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिली आहे.राज्य शासनाच्या वतीने आता शालेय गणवेश विद्यार्थ्यांना वितरित करण्यासाठी स्थानिक शाळा व्यवस्थापन समितीच्या खात्यात निधी वळता करण्यात येणार आहे, असे राज्य शासनाच्या नव्या निर्णयात नमूद करण्यात आले आहे.

**वंचित शाळांना दिलासा**

'एक राज्य, एक गणवेश योजनेअंतर्गत जिल्ह्यात कापडांचा लवकर पुरवठा झाला नाही. परिणामी शैक्षणिक सत्र शेवटच्या टप्प्यात असतानाही अजूनही बऱ्याचशा विद्यार्थ्यांना शासनाकडून मोफत गणवेश मिळाले नाही. जिल्ह्यात प्रत्येक तालुक्यातील दहा अशा जवळपास १०० पेक्षा अधिक शाळा गणवेशापासून वंचित राहिल्या होत्या. या शाळांनाही आता दिलासा मिळणार आहे.

# २३ डिसेंबर रोजी डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती व्याख्यानमालेचे आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक दि. २१ अमरावती**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील डॉ. पंजाबराव देशमुख प्रादेशिक अर्थव्यवस्था नियमन केंद्राच्यावतीने दि. २३ डिसेंबर, २०२४ रोजी सायं. ६.०० वा. श्रीमती विमलाबाई देशमुख सभागृहामध्ये डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे. 'डॉ. पंजाबराव देशमुख : नेतृत्व आणि विचार' या विषयावर शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथील राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. प्रकाश पवार हे व्याख्यान देणार असून कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष तथा विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य श्री हर्षवर्धन देशमुख, प्रमुख अतिथी म्हणून विद्यापीठाच्या आंतर विद्याशाखेच्या अधिष्ठाता डॉ. वैशाली गुडधे राहणार आहेत. तरी या व्याख्यानमालेला उपस्थित राहून सर्वांनी लाभ घ्यावा, असे आवाहन कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, डॉ. पंजाबराव देशमुख प्रादेशिक अर्थव्यवस्था नियमन केंद्राचे समन्वयक डॉ. महेंद्र मेटे, श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे सचिव डॉ. व्ही.जी. ठाकरे यांनी केले आहे.